# कल्याणमध्ये पुन्हा एकदा मराठी विरुद्ध परप्रांतीय वाद

कल्याण, दि. २२ वृत्तसंस्था

मारहाणीत मराठी महिला आणि आईला गंभीर मार लागला आहे. तसेच तिचा पती जखमी झाला आहे. मराठी महिलेचा पती हा पोलीस कर्मचारी आहे. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. मानपाडा पोलीस ठाण्यात यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस यासंदर्भात तपास करत आहेत. काल रात्री 10 वाजण्याच्या सुमारास अडीवली येथील रागाई इमारतीमध्ये 2 शेजारी राहणाऱ्या कुटुंबामध्ये वाद झाला होता. लहान मुलांच्या खेळण्यावरुन हा वाद झाला होता. यामध्ये अल्पवयीन मुलीचा शेजाऱ्याने विनयभंग केल्याची तक्रार तिच्या आईने केली. याचा जाब विचारल्यानंतर मराठी कुटुंबाला मारहाण केली आहे. मानपाडा पोलिसांनी यासंदर्भात माहिती दिली.


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com



संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात



* वर्ष ५४ * अंक २६६ * * नागपूर * सोमवार, दिनांक २३ डिसेंबर २०२४ ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


संपादकीय

खरीखरी

## खाते वाटपाचे कौशल्य

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशन मुद्दाम नागपूरला ठेवून, नागपूर कराराचा धर्म पाळला. गेल्या पाच वर्षात दोन वेळा उद्धव ठाकरे यांच्या आजारपणामुळे किंवा तत्कालीन सरकारच्या दुर्लक्षामुळे हिवाळी अधिवेशन झाले नव्हते. यावेळी अत्यंत कौशल्यपूर्ण रीतीने मुख्यमंत्री फडणवीस यांनी खाते वाटपाचा तिढा सोडवलेला आहे. खाते वाटपावरून किंतु-परंतु होऊ नये. म्हणून सर्व प्रकारची साधक बाधक चर्चा करून ज्या पद्धतीने खाते वाटप केले. ते आजच्या परिस्थितीत योग्य नव्हते, असे कोणीच म्हणणार नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गृह खाते आपणास मिळावे यासाठी फार आग्रही होते. थोडे रुसलेलेही होते. पण शेवटी त्यांना शहर विकास आणि नियोजन मंत्रालयासारखे खाते त्यांना स्वीकारावे लागले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना शिंदे यांच्याकडे हेच खाते होते. त्याच खात्यामुळे एकनाथरावांना आपले आमदार सांभाळणे जड गेले नव्हते. आताही तशीच स्थिती आहे. शिंदे यांचे गेल्यावेळी ४० पैकी दहा आमदार मंत्री होते. आता ५७ पैकी १२ आहेत. त्यामुळे नाराज आमदारांना समजावून सांगणे, त्यांना योग्य तो मान देणे आणि ज्यांना मंत्रिपदे मिळाली नाहीत. त्यांना अडीच वर्षाचे गाजर दाखवणे, हे कार्य एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांनी अत्यंत कार्यक्षमतेने पार पाडले. भारतीय जनता पक्षामध्येही आता १३७ आमदार आहेत. म्हणजेच ११० आमदारांना मंत्रीपद मिळालेले नाही. त्यांनाही मुख्यमंत्र्यांना सांभाळायचे होते. तिकडे राष्ट्रवादीमध्ये आपले मंत्रीपद पक्के समजणाऱ्या भुजबळांना डच्चू मिळाल्यामुळे त्यांच्या नाराजीचा फटकाही राष्ट्रवादीला नक्कीच बसला असेल. पण एवढ्या मंत्रिमंडळाचे खातेवाटप वाटते तितके सोपे नव्हते. मंत्रिमंडळात अनेक जिल्ह्यांना तीन-तीन मंत्री पदे मिळाली. तर काही जिल्हे बिनमंत्र्यांचे राहले. त्याचाही समतोल साधणे आवश्यक होते. अत्यंत कार्यक्षम असणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी म्हणजेच नागपूरकर फडणवीस यांनी खाते वाटपाचा प्रश्न सहजरीत्या आणि अत्यंत कौशल्याने सोडविला. गृह खाते आपल्याजवळ ठेवले. अर्थ खात्याचा कारभार अजित पवार यांना देण्याचे ठरले होते. तेच खाते त्यांना देण्यात आले. प्रत्येक मंत्र्याला त्याच्या कार्य कौशल्याप्रमाणे आणि त्याच्या कारकीर्दीतील व्यवहारामुळे जे जे खाते द्यायचे. ते ते खाते त्या त्या लोकांना दिले गेले. मागील सरकारमधील अनेकांना मंत्री तर केले. पण मोठ्या वकूबाची खाती वकुबदरांनाच देण्यात आली आहेत. हे या खाते वाटपाचे वैशिष्ट्य आहे. हे सरकार पुढील पाच वर्ष चालवायचे आहे. नुकत्याच संपलेल्या निवडणुकीच्या आधी जी जी आश्वासने दिली. त्यांची पूर्तता करणे आवश्यक आहे. सध्या सरकारवर आत्ताच आठ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज आहे. तीस वर्षांपूर्वी या महाराष्ट्रावर कवडीचेही कर्ज नव्हते. सर्वाधिक कार्यक्षम असे राज्य म्हणून आपला नावलौकिक होता. आता त्या नावलौकिकाचा पारा थोडा घसरल्यामुळे कार्यकुशल नेतृत्वाची गरज होती. राज्याची अर्थव्यवस्था मोटारीच्या चाकाप्रमाणे पंचर होऊ नये. यासाठी मुख्यमंत्र्यांनी दक्ष राहणे आवश्यक होते. प्रत्येक मतदार संघाच्या आशा-अपेक्षा वाढलेल्या आहेत. आमदारांना विकासासाठी वर्षाला जी रक्कम मिळते. ती रक्कम देण्याचा परिपाठ बंद करता येत नाही आणि जनतेच्या उरावर आणखी बोजाही टाकता येत नाही. म्हणजे सहन होत नाही आणि सांगताही येत नाही अशी सगळी परिस्थिती आहे. पण या सरकारने जी जी धोरणे आखली आहेत. त्यांचा पाठपुरावा करून नव्या मंत्रिमंडळाला एकसंघपणे कार्य करावयाचे आहे. अनेक मंत्री थोडेसे नाराज असले तरी मंत्रिमंडळात स्थान आहे. हेच त्यांच्यासाठी महत्त्वाचे आहे. जे जे खाते मिळाले असेल, त्या खात्यात चमकदार कामगिरी करण्याचे आव्हान मंत्रिमंडळातील सर्वांपुढेच आहे. डबल इंजिनचे सरकार असल्याने केंद्राकडून फार मोठा वाटा मिळेल. अशा भ्रमात कोणीही राहू नये. महाराष्ट्रात सरकार कोणाचेही असले तरी सध्याचे जे निकष आहेत. त्या निकषावरून कधीच योग्य तो वाटा महाराष्ट्राला मिळत नाही. त्यामुळे आता सर्व मंत्री कामाला लागावेत आणि महाराष्ट्र राज्याला देशातील क्रमांक एकचे स्थान पुन्हा मिळावे किंवा कायम राहावे. हीच या राज्यातील आशावादी जनतेची अपेक्षा आहे. मुख्यमंत्री आता आपल्या सहकाऱ्यांसह महाराष्ट्राला सह्याद्रीच्या उंचीवर नेऊन ठेवतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# आता पालकमंत्री पदावरून रस्सीखेच

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी








अखेरकार शनिवारी 21 डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस सरकारचं खातेवाटप जाहीर झालंय. काही महत्त्वाची खाती भाजपाकडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला तर काही खाती शिवसेनेकडून भाजपाला देण्यात आलीत. विशेष म्हणजे अजित पवार अर्थ खाते आपल्याकडे ठेवण्यात यशस्वी झालेत, तर शिवसेनेकडे असलेले उत्पादन शुल्क खातेही अजित पवारांनी स्वतःकडे घेतलंय. परंतु खातेवाटपानंतर आता पालकमंत्रिपदावरून महायुतीत मोठ्या प्रमाणात रस्सीखेच बघायला मिळत आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळूनसुद्धा मुख्यमंत्रिपदापासून खाते वाटपापर्यंत जवळपास महिन्याभराचा कालावधी गेलाय. त्यानंतर आता पालकमंत्रिपदावरून महायुतीत रस्सीखेच सुरू झालीय. बीडमध्ये पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे या दोन्ही भावा बहिणींनी मंत्रिपदं आपल्याकडे घेतल्यानंतर आता पालकमंत्रिपदासाठी आग्रहाची भूमिका घेतलीय. पंकजा मुंडे यांचा मागच्या विधानसभा आणि त्यानंतर झालेल्या आताच्या लोकसभा निवडणुकीत पराभव झाला होता. परंतु भाजपाकडून विधान परिषदेवर त्यांची वर्णी लावण्यात आल्यानंतर आता मंत्रिमंडळ विस्तारात त्यांच्याकडे पर्यावरण आणि हवामान बदल, पशुसंवर्धन खात्याची जबाबदारी देण्यात आलीय. तर शिंदे सरकारमध्ये कृषिमंत्रिपदाची जबाबदारी पार पाडणाऱ्या धनंजय मुंडे यांच्याकडे अन्न आणि नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण खात्याची जबाबदारी देण्यात आलीय. तरीही बीडच्या पालकमंत्री पदासाठी या दोन्ही नेत्यांकडून परस्पर दावा केला जातोय.

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून यापूर्वीसुद्धा अनेक वाद निर्माण झालेत. महाविकास आघाडी सरकारच्या दरम्यान रायगड जिल्ह्याचे पालकमंत्रिपद हे अदिती तटकरे यांच्याकडे होतं. तेव्हा शिवसेना आमदार भरत गोगावले, महेंद्र थोरवे आणि महेंद्र दळवी यांनी तटकरे विरोधात भूमिका घेतली होती. त्यानंतर महायुतीचं सरकार स्थापन झाल्यानंतर उदय सामंत यांच्याकडे रायगडचं पालकमंत्रिपद सोपवण्यात आलं. आता महायुतीत अजित पवार यांचा समावेश असल्याकारणाने रायगडच्या पालकमंत्रिपदावरून पुन्हा रस्सीखेच सुरू झालीय. त्यातच भरत गोगावले यांनी रायगडच्या पालकमंत्रिपदावर दावा केला असल्याने हा पेच सोडवायला मुख्यमंत्र्यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. यंदाच्या मंत्रिमंडळ विस्तारात अदिती तटकरे यांच्याकडे महिला आणि बालकल्याण हे खातं कायम ठेवण्यात आलं असून, भरत गोगावले यांना रोजगार हमी, फलोत्पादन, खारपाणपट्टा विकास हे खातं देण्यात आलंय.

दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगरच्या पालकमंत्री पदावर दावा केलाय. या मुद्द्यावर बोलताना ते म्हणाले की, मागील 40 वर्षांपासून मी शिवसेनेचं काम करीत आलोय. त्या कामाचं, कष्टाचं फळं मला मिळालंय. मंत्रिपदाची ही संधी मला लोकांची सेवा करण्यासाठी मिळाली असून, सामाजिक न्याय या खात्याचं मंत्रिपद मला मिळालं असल्याकारणाने मी फार आनंदित आहे. यासोबत छत्रपती संभाजीनगरचा पालकमंत्री मीच होणार असून, या संदर्भातील फक्त औपचारिक घोषणा बाकी असल्याचंही संजय शिरसाट म्हणालेत. तर दुसरीकडे भाजपाचे नेते, ओबीसी कल्याण, दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांनीसुद्धा छत्रपती संभाजी नगरच्या पालकमंत्रिपदावर दावा केला असल्याने पालकमंत्रिपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडते, हे पाहणं आता महत्त्वाचं ठरणार आहे.

# सर्वसामान्यांवर मोदी सरकारचा महागाई बॉम्ब, जीएसटीचा मारा

जैसलमेर, दि. २२ वृत्तसंस्था

राजस्थानमधील जैसलमेर येथे जीएसटी परिषदेची 55वीं बैठक झाली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या नेतृत्वात ही बैठक झाली. यामध्ये जीएसटी दराबाबत फेरविचार झाला. तर काही वस्तूंवरील जीएसटी कायम ठेवण्यात आला. तर काही वस्तूंवर जीएसटी लावण्यात आला आहे. एकीकडे कर्जावरील व्याज दरात कपात होत नसताना मोदी सरकारने पुन्हा एकदा महागाईचा बॉम्ब टाकला आहे. विमा क्षेत्रात जीएसटी कपातीचा निर्णय घेण्याच्या आग्रही मागणीला सुद्धा जीएसटी परीषदेने वाटण्याच्या अक्षता लावल्याने देशभरात नाराजीचा सूर आळवला गेला.

फोर्टिफाईड तांदळावरील कर रचना परिषदेने अजून सुटसुटीत केली. जीएसटी परिषदेने त्यावर 5% जीएसटी लावण्याचा निर्णय घेतला. त्याचा वापर कोणताही पदार्थ तयार करण्यासाठी होत असेल तरी रेडी टू इट पॉपकॉर्नवर कर द्यावा लागणार आहे. साधे पॉपकॉर्न ते मसाला




पॉपकॉर्न, पॅकेज्ड अथवा लेबल लावलेले नसतील तर त्यावर 5% जीएसटी मोजावा लागणार आहे. तर पॅकेज्ड आणि लेबल लावलेल्या पॉपकॉर्नसाठी 12% जीएसटी द्यावा लागणार आहे. तर साखर आणि कॅरमेलपासून तयार पॉपकॉर्नसाठी सर्वाधिक 18% जीएसटी मोजावा लागेल.

जुन्या आणि वापरलेली कार खरेदी करण्यासाठी ग्राहकांना आता अधिक रक्कम मोजावी लागणार आहे. यामध्ये पेट्रोल-डिझेल वाहनं आणि इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश आहे. या वाहनांच्या विक्रीवर 12 ते 18 टक्के जीएसटी मोजावा लागणार आहे. विमावरील जीएसटी कपातीचा निर्णय सध्या परीषदेने थंड बस्त्यात ठेवला आहे. या मुद्दावर मंत्री गटाच्या (GoM) बैठकीत एकमत झाले नाही. त्यावर आता अजून काथ्याकूट करण्यात येणार आहे.

### या 148 वस्तूंच्या जीएसटीवर फेरविचार

जीएसटी परीषद 148 वस्तूंवरील जीएसटीबाबत फेरविचार करणार आहे. त्यामध्ये आलिशान वस्तू जसे की घड्याळं, पेन, पादत्राणं, बूट, महागडे कपडे यांचा समावेश आहे. यावर जीएसटी वाढवण्याचा विचार करण्यात येत आहे. याशिवाय तंबाखू जन्य पदार्थांवरील सीन गुड्ससाठी 35% कर स्लॅबवर विचार करण्यात येत आहे. फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्म्स, स्विगी आणि झोमॅटोवर कराचा दर 18% टक्क्यांहून कमी करत 5% करण्यात येणार आहे.

# राहुल गांधींचा आज परभणी दौरा

## सुर्यवंशीच्या नातेवाईकांची घेणार भेट

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

परभणीतील सोमनाथ सुर्यवंशी या तरुणाचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाल्याचं प्रकरण राज्यानंतर आता देशपातळीवर पोहोचणार आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे सोमवारी परभणीला भेट देणार आहेत. गेल्या आठवड्यात न्यायालयीन कोठडीत सोमनाथ सुर्यवंशी या तरुणाचा मृत्यू झाला. या तरुणाच्या नातेवाईकांची राहुल गांधी भेट घेणार आहेत. राहुल गांधी सोमवारी दुपारी एका विशेष विमानानं नांदेडला पोहोचणार आहेत. तेथून गांधी परभणी येथेली सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी या तरुणाच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करणार आहेत.



कशामुळे सोमनाथ सुर्यवंशीला झाली होती अटक? 10 डिसेंबर रोजी मानसिक आजारी असलेल्या व्यक्तीनं परभणी रेल्वे स्थानकाजवळ संविधानाच्या प्रतिकृतीची केल्यानंतर परभणीत हिंसाचार उसळला होता. परभणीमध्ये नागरिकांकडून तणावपूर्ण बंद पाळण्यात आला. बंद दरम्यान आक्रमक झालेल्या काही तरुणांनी वाहनांची तोडफोड आणि दगडफेक केली. उसळलेल्या हिंसाचारानंतर परभणी पोलिसांनी 12 डिसेंबर रोजी सूर्यवंशी याच्यासह सुमारे 300 लोकांना ताब्यात घेतले. मात्र, 72 तासानंतर सोमनाथचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. या घटनेवरून राज्यात कायदा आणि सुव्यवस्था बिघडल्याचा महाविकास आघाडीनं महायुती सरकारवर आरोप केला.



*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी दुपारी अहिल्यानगर येथे आदर्शगाव हिवरे बाजारचे प्रणेत पोपटराव पवार यांचे चिरंजीव प्रसन्न यांच्या विवाहासाठी आले होते. त्यावेळी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्याशी त्यांची भेट झाली. फडणवीस यांनी हजारे यांना आदरपूर्वक नमस्कार केला. लोकायुक्त विधेयक आणि त्यासाठी आंदोलने यानंतर अनेक वर्षांनी या दोघांची प्रत्यक्ष भेट झाली. त्यामुळे दोघांनीही एकमेकांची आस्तेवाईकपणे चौकशी केली.*






# मला वाटते भुजबळांनी पंतप्रधान व्हावे - कोकाटे

नाशिक, दि. २२ प्रतिनिधी

राज्यात विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी झाल्यानंतर हिवाळी अधिवशनाच्या सुरुवातीला मंत्रिमंडळ विस्तार झाला. यामध्ये राष्ट्रवादीने (अजित पवार) ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना डावलले. यानंतर भुजबळांनी आक्रमक पावित्रा घेतला आहे. मंत्रिमंडळात स्थान न दिल्याने छगन भुजबळ यांनी पक्षाचे अध्यक्ष अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर टीका केली होती. दरम्यान राष्ट्रवादीने यावेळी नाशिक जिल्ह्यातून भुजबळ यांच्याऐवजी माणिकराव कोकाटे यांना मंत्रिमंडळात स्थान दिले आहे. काल मंत्रिमंडळाचे खाते वाटप झाल्यानंतर कोकाटे यांना कृषी खाते मिळाले आहे. मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर कोकाट प्रथमच मतदारसंघात आले होते. त्यावेळी छगन भुजबळ यांच्या नाराजी विषयी बोलताना, "मला वाटते भुजबळांनी पंतप्रधान व्हावे देशाचे", असे विधान केले आहे. मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर माणिकराव कोकाटे प्रथमच आपल्या सिन्नर मतदारसंघात आले होते. यावेळी पत्रकारांनी त्यांना मंत्रिपद आणि छगन भुजबळ यांच्या नाराजीविषयी विचारले. छनग भुजबळ यांना अजित पवार यांनी राज्यसभेचा शब्द दिला होता, तो पूर्ण केला नाही असे भुजबळ बोलले असल्याचे पत्रकार म्हणाले. यावर उत्तर देताना कोकाटे म्हणाले, "शब्द पूर्ण होईल ना. सरकार स्थापन होऊन आतातरी ४ दिवस झाले आहेत. राज्यसभा कुठे पळून चालली आहे. दम तर काढला पाहिजे ना." यावेळी पत्रकारांनी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना विचारले की, तुम्हाला वाटते का भुजबळांनी राज्यसभेत जावे? यावर कोकाटे म्हणाले, "त्यांना जे काही पाहिजे ते त्यांनी मागावे. मला काय वाटते याला काही अर्थ नाही. मला वाटते भुजबळांनी देशाचे पंतप्रधान व्हावे. मला काय वाटते ते देशामध्ये, जगामध्ये होईलच असे नाही." असे ते म्हणाले.

# फडणवीसांच्या परवानगीनंतरच मंत्र्यांना खासगी सचिव आणि स्टाफ नेमता येणार

मुंबई, दि. २२ प्रतिनिधी

राज्यातील मंत्र्यांचे खातेवाटप झाल्यानंतर आता त्यांच्या खासगी सचिव, पीए आणि विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांनी आणि स्टाफच्या नेमणुकीची लगबग सुरू झाली आहे. पण या नेमणुका आता केवळ मंत्र्यांच्या मर्जीने होणार नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या कार्यालयातून नावांना संमती मिळाल्यानंतरच या नेमणुका होणार आहेत.

भाजप सहित राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या मंत्र्यांनाही आपला स्टाफ नेमताना मुख्यमंत्र्यांची परवानगी घ्यावी लागणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या परवानगीनंतरच मंत्र्यांना त्यांचे खाजगी सचिव, पीए, विशेष कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांच्या नेमणुका करता येणार आहेत. हीच पद्धत देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यावर, 2014 साली वापरली होती. आताही तीच पद्धत वापरण्यात येणार आहे. मंत्रालयात वादग्रस्त अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या रोखण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रयत्न आहे. महाविकास आघाडीच्या काळात मंत्री आस्थापनेवर काम केलेल्या अधिकाऱ्यांच्या नेमणुकींनाही यावेळी ब्रेक लागण्याची शक्यता वर्तवली आहे. महाविकास आघाडीच्या काळात जे अधिकारी मंत्र्यांच्या आस्थापनेवर काम करत होते त्यांना महायुती सरकारच्या मंत्र्यांसोबत काम करता येणार नाही अशी माहिती आहे. अशा अधिकाऱ्यांच्या नेमणुका होऊ नये यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाने नावांची छाननी सुरू केल्याची माहिती समोर येत आहे.

महत्त्वाचं म्हणजे हा नियम केवळ भाजपच्या मंत्र्यांनाच लागू नाही तर अजित पवारांच्या राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या मंत्र्यांनाही लागू असेल.

# पंतप्रधान मोदींना कुवेतचा सर्वोच्च नागरी सन्मान 'द ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर' ने सन्मानित

कुवेत, दि. २२ वृत्तसंस्था

कुवेतमध्ये पंतप्रधान मोदींना तेथील सर्वोच्च नागरी सन्मानाने सन्मानित करण्यात आले आहे. कुवेतचे अमीर शेख मेशाल अल-अहमद अल-जाबेर अल सबाह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना 'द ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर' देऊन सन्मानित केले. पंतप्रधान मोदी दोन दिवसांच्या कुवेत दौऱ्यावर आहेत. याआधी 19 देशांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांच्या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित केले आहे. या यादीत समाविष्ट होणारा हा 20 वा देश आहे. भारत आणि कुवेतमधील चांगले संबंध दृढ करण्यासाठी पंतप्रधान मोदींना हा पुरस्कार देण्यात आला आहे. 'ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर' हा राष्ट्रप्रमुख आणि परदेशी



सार्वभौम आणि परदेशी राजघराण्यातील सदस्यांना मैत्रीचा इशारा म्हणून दिला जातो. पीएम मोदींपूर्वी बिल क्लिंटन, प्रिन्स चार्ल्स आणि जॉर्ज बुश यांसारख्या परदेशी नेत्यांनाही 'द ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. गेल्या महिन्याच्या सुरुवातीला गयाना आणि बार्बाडोसने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने सन्मानित केले होते. गयानाने पंतप्रधान मोदींना सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान - ऑर्डर ऑफ एक्सलन्सने सन्मानित केले होते, तर बार्बाडोसमध्ये पीएम मोदींना बार्बाडोसच्या स्वातंत्र्याचा प्रतिष्ठित मानद ऑर्डर देण्यात आला होता. डॉमिनिकाने नुकताच त्याला सर्वोच्च सन्मानही दिला.

## संक्षिप्त

### भिवंडीत दोन वाहनांची चोरी

**भिवंडी, दि. २२ : प्रतिनिधी**

शहरात वाहन चोरीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून एकाच दिवसात दोन वाहन चोरीच्या घटनांची नोंद विविध पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.पहिल्या घटनेत आतिक मोबीन खान (२५ रा. ओवळी गाव) यांनी त्यांची पन्नास हजार रुपये किमतीची मोटरसायकल पाटील धाब्याच्या बाजूस ओवळी गेटच्या समोर पार्क करून ठेवली असल्या अज्ञात चोरट्याने चोरून नेली याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दुसऱ्या घटनेत इमरान जंगबहादुर मोमीन (२४ रा.कल्याण नाका) यांनी त्यांची ४५ हजार रुपये किमतीची मोटरसायकल कल्याण नाका परिसरात पार्क करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली.याप्रकरणी भिवंडी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अवैध नळ जोडणी करणाऱ्या हॉटेल चालकांविरोधात गुन्हा दाखल

**भिवंडी, दि. २२ : प्रतिनिधी**

महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता अवैधपणे हॉटेल व चहाच्या दुकानाला पाणीपुरवठा करणाऱ्या दोन हॉटेल व्यवसायकांविरोधात महापालिका प्रशासनाने शांतीनगर पोलीस ठाण्यात मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.हबीब मस्तान शेख व नदम नायब रसूल असे गुन्हा दाखल झालेल्या हॉटेल व्यवसायिकांची नावे आहेत.या दोघांनीही शहरातील शांतीनगर परिसरात नागाव व गैबी नगर परिसरात केजीएन फास्ट फूड हॉटेल व राणी चाय हॉटेल या करिता महापालिकेची कोणती परवानगी न घेता महापालिकेच्या पाईपलाईन ला अनधिकृतपणे टॅपिंग करून मनपाचे ३५ हजारांचे नुकसान करून अवैध नळ जोडणी केली होती. याप्रकरणी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील कर्मचारी विराज भोईर यांनी दोघांविरोधात शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### जुगार अड्ड्यावर कारवाई

**भिवंडी, दि. २२ : प्रतिनिधी**

शहरात जुगार मोठ्या प्रमाणात खेळवला जात असून निजामपुरा पोलिसांनी खडक रोड येथील कांदा बटाटा मार्केट जवळ असलेल्या मोकळ्या जागेत मटका जुगार खेळणाऱ्या जुगार अड्ड्यावर छापा मारून तीन जणांविरोधात मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे.सोमनाथ विठोबा कांबळे (५४),नजीम अब्दुल बारी मोमीन (६२), राजकुमार केदारनाथ सोनी (५६) अशी गुन्हा दाखल झालेल्या तिघांची नावे असून या तिघांनीही त्यांच्या स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी खडक रोड परिसरातील कांदा बटाटा मार्केटच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत जुगार अड्डा सुरू केला होता. या ठिकाणी निजामपुरा पोलिसांनी छापा टाकून २५२० रुपये रोख रक्कम व जुगार साहित्य जप्त करून तिघां विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### भंगार सामान बाजूला ठेवण्यास सांगितल्याच्या रागातून दोघांना बेदम मारहाण

**भिवंडी, दि. २२ : प्रतिनिधी**

रस्त्याच्या मधोमध व कार्यालयासमोर भंगार सामान ठेवल्याच्या रागाने झालेल्या हाणामारीत दोघांना बेदम मारहाण झाली असल्याची घटना बुधवारी कोटर गेट मशिदीच्या मागे जैतून पूरा परिसरात घडली आहे.याप्रकरणी दोघांविरोधात भिवंडी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मोहम्मद उर्फ उमर मुल्ला युनूस मोमीन (५७) व इस्माईल युनूस मोमीन (५३ दोघे रा. जैतून पुरा) असे मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या दोघा आरोपींचे नाव आहेत.या दोघांनी फहाद मोहम्मद फिरोज शेख (२२ ) व त्याचा मामे भाऊ इब्राहिम सय्यद असे दोघेजण जैतूनपुरा येथील एका कार्यालयात बसले असता आरोपी मोहम्मद उर्फ उमर मुल्ला युनूस मोमीन याने सदर कार्यालयासमोर भंगार सामान ठेवले असता फहाद याने सदरचे भंगार सामान रस्त्याच्या बाजूला ठेवा, लोकांना जाण्या येण्यासाठी रस्ता सोडा असे सांगितले असता आरोपी मोहम्मद उर्फ उमर मुल्ला व इस्माईल युनुस मोमीन या दोघांनाही या गोष्टीचा राग आला असता, ही कोणाच्या बापाची जागा नाही मी इथेच भंगार सामान ठेवणार असे बोलून फहाद मोहम्मद फिरोज शेख व त्याचे मामा व मामेभाऊ अशा तिघांना शिवीगाळ करून ठोश्या बुक्क्याने मारहाण केली. तर आरोपी इस्माईल याने फिर्यादीचा मामा अब्दुल हमीद युनूस सय्यद (५०) यांचे दोन्ही हात पकडून भंगार सामानात पडलेली कपाटाची काच मामाच्या कपाळावर मारून दुखापत केली.या मारहाण प्रकरणी पहात शेख यांनी मोहम्मद उर्फ उमर मुल्ला युनूस मोमीन व इस्माईल या दोघांविरोधात भिवंडी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असता पोलिसांनी या दोघांनाही अटक केली आहे.

# देव, देश, धर्म आणि मंदिरे रक्षणासाठी महायुती सरकार कटिबद्ध असल्याची मंत्री आणि आमदार यांची ग्वाही !

**नागपूर, दि. २२ : प्रतिनिधी**



लोकसभेतील 'व्होट जिहाद'च्या षड्यंत्राला महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत हिंदूंनी 'एक है, तो सेफ है'द्वारे चोख प्रत्युत्तर दिले. हिंदूंनी बहुमत देऊन आम्हाला निवडून दिले, याची जाणीव ठेवून आम्हीही हिंदुत्वासाठी समर्पित होऊन कार्य करू. देव, देश, धर्म आणि मंदिरे यांच्या रक्षणासाठी महायुती सरकार कटिबद्ध आहे, अशी ग्वाही महायुती सरकारच्या वतीने उपस्थित ४ मंत्री आणि ५ आमदार यांनी समस्त हिंदूंना दिली आहे. नवनिर्वाचित महायुती सरकारचे अभिनंदन करण्यासाठी सीताबर्डी येथील विदर्भ साहित्य संघाच्या सभागृहात हिंदु जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'धर्मप्रेमी लोकप्रतिनिधी सन्मान सोहळा' आयोजित करण्यात आला होता. संत-महंत आणि मंदिर विश्वस्त यांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहपूर्ण आणि आनंदमय वातावरणात पार पडला.

या वेळी उपस्थित लोकप्रतिनिधींचा सन्मान करण्यात आला. या सोहळ्याला भाजप नेते आणि कॅबिनेट मंत्री श्री. अतुल सावे, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि कॅबिनेट मंत्री श्री. भरतशेठ गोगावले, भाजप नेते आणि कॅबिनेट मंत्री श्री. जयकुमार रावल, शिवसेना नेते आणि राज्यमंत्री श्री. आशिष जयस्वाल, भाजपचे आमदार श्री. नारायणराव कुचे, आमदार श्री. प्रतापराव अडसड, आमदार श्री. राम भदाणे आणि शिवसेनेच्या विधान परिषदेच्या आमदार डॉ. मनीषा कायंदे, आमदार श्री. आनंद बोंडारकर हे उपस्थित होते. या सर्व मान्यवरांचे सन्मान या वेळी करण्यात आले आणि त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. नागपूर येथील गुरुकृपा सेवा संस्थानचे पू. भगीरथी महाराज, सनातनचे संत पू. अशोक पात्रीकर, ह.भ.प. मनोज महाराज मिरकुटे यांची वंदनीय उपस्थिती या वेळी लाभली. महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट, सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक, अखिल भारतवर्षीय माहेश्वरी महासंघाचे सभापती श्री. श्यामसुंदर सोनी, भाजपचे शहर अध्यक्ष श्री. अनिल शर्मा, लोक जागृती मोर्चाचे अध्यक्ष अधिवक्ता रमण सेनाड, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे श्री. रामनारायण मिश्र, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे जिल्हा संयोजक श्री. दिलीप कुकडे आणि हिंदु जनजागृती समितीचे विदर्भ समन्वयक श्री. श्रीकांत पिसोळकर आदी मान्यवरही या वेळी उपस्थित होते.

या वेळी महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या सदस्यता नोंदणी अभियानाचे उद्घाटन उपस्थित मंत्री आणि आमदार यांच्या हस्ते करण्यात आले. आतापर्यंत मंदिर महासंघाशी १५ हजार मंदिरे देशभर जोडली गेलेली आहेत.

बांगलादेशाची निर्मिती झाली तेव्हा तेथे १५ टक्के हिंदू होते, आता ८ टक्के झाले आहेत. ही स्थिती भारताची व्हायला नको. छत्रपती संभाजीनगर येथून मला हिंदू जनतेने निवडून दिले, याची मला जाणीव आहे. त्यामुळे हिंदुत्वासाठीच मी राजकारणात कार्यरत आहे. हिंदुत्व ही माझ्या राजकारणाची ऊर्जा आहे, असे मा. मंत्री श्री. अतुल सावे यांनी या वेळी म्हटले.

काँग्रेसचे नेते अद्यापही स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर टीका करत आहेत. हिंदू युवती लव्ह जिहादला बळी पडत आहेत. ही सर्व हिंदु धर्मावरील संकटे आहेत. देव, देश आणि धर्म सुरक्षित राहिला, तर आपण सुरक्षित राहू शकतो. हिंदूंनी एकत्र आल्यास त्यांना टक्कर देण्याचे कुणाचे धारिष्ट्य होणार नाही, असे परखड प्रतिपादन मा. मंत्री श्री. भरतशेठ गोगावले यांनी केले.

हिंदूंनी शक्ती पणाला लावल्यामुळे आम्ही निवडून आलो. हिंदूंच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आले आहे. त्यामुळे सरकार हिंदूंच्या हितासाठी कार्य करेल. हिंदूंनीही सरकारच्या पाठीशी ठामपणे उभे रहावे, असे आवाहन मा. मंत्री श्री. जयकुमार रावल यांनी केले.

बांगलादेशात अल्पसंख्यांक हिंदूंवर अत्याचार करण्यात आले. तसे जर भारतात हिंदू अल्पसंख्यांक झाले, तर काय होईल, याचा विचार करा. यावर केवळ निवेदन देणे आणि मेणबत्ती मोर्चा काढणे, हे उत्तर नाही. हिंदू अल्पसंख्यांक होणार नाहीत, याची दक्षता हिंदूंनी घ्यायला हवी. हिंदू अल्पसंख्यांक होणे, ही भारतासाठी धोक्याची घंटा आहे. हे संकट रोखण्यासाठी राष्ट्रहितासाठी समान नागरी कायद्यासारखे महत्त्वाचे निर्णय सरकारला घ्यावे लागतील, असे मा. राज्यमंत्री श्री. आशिष जयस्वाल म्हणाले.

या वेळी शिवसेनेच्या विधान परिषदेतील आमदार डॉ. मनीषा कायंदे म्हणाल्या की, हिंदूंच्या सणांच्या वेळी पर्यावरणाचा ऱ्हास असा अपप्रचार केला जातो. अन्य धर्मियांच्या श्रद्धास्थानांचा अवमान झाला, तर हिंसाचार केला जातो; परंतु चित्रपटसृष्टीमध्ये हिंदूंच्या श्रद्धास्थानांचा सातत्याने अवमान होतो, तेव्हा धर्मनिरपेक्ष मंडळी गप्प रहतात. हिंदु धर्माचा अवमान धर्मनिरपेक्ष देशात कसा चालतो? तर भाजपचे आमदार श्री. प्रताप अडसड म्हणाले की, केंद्रात हिंदुत्वनिष्ठ शासन आले नसते, तर श्रीराम मंदिर उभारणे, काश्मीरमधून ३७० कलम हटवणे हे झाले नसते. त्यामुळे हिंदुत्वनिष्ठ शासन येण्यासाठी हिंदूंनी जागरूक असायला हवे. यासाठी हिंदूंनी राजकीयदृष्ट्या सजग रहाणे आवश्यक आहे. शिवसेनेचे नांदेड येथील आमदार श्री. आनंद बोंडालकर म्हणाले की, धर्म टिकला, तर आपण सुरक्षित राहू. त्यामुळे हिंदूंनी समर्पित होऊन धर्मकार्य करण्याची आवश्यकता आहे. हिंदु धर्माचे रक्षण आणि गोहत्या रोखण्यासाठी हिंदूंनी प्राणपणाने कार्य करणे आवश्यक आहे.

यावेळी हिंदु जनजागृती समितीचे राज्य संघटक श्री. सुनील घनवट म्हणाले की, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहात म्हटले होते की, हिंदूंची मंदिरे का कह्यात घेतली जातात अन्य धर्मियांची मंदिरे ताब्यात का घेतली जात नाहीत ? आज एकतरी मशीद किंवा चर्च सरकारच्या ताब्यात आहे का ? यावर आमची मागणी आहे की 'सनातन धर्मियांच्या मंदिरासाठी राज्य सरकारने तात्काळ 'सनातन मंडळा'ची स्थापना करावी. सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक म्हणाले की, आपण कोणत्याही संप्रदाय किंवा संघटनेचे असलो, तरी आपल्याला राजकीयदृष्ट्या जागृत रहाणे आवश्यक आहे. देशात परिवर्तन झाल्याने अयोध्या येथे प्रभू श्रीरामांचे मंदिर उभे राहिले. तसेच महाराष्ट्रात धर्मांतरबंदी कायदा पारित होईल, अशी अपेक्षा लोकप्रतिनिधींकडून बाळगून आहोत. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव आणि चित्रलेखा साप्ताहिकाचे माजी संपादक ज्ञानेश महारावसारखे लोक हे देवीदेवतांवर अतिशय खालच्या पातळीवर टीका करूनही ही मंडळी मोकाट आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होण्यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा, असेही श्री. वर्तक म्हणाले.

## समाविष्ट गावातीत पाणी प्रश्न सोडवण्यासाठी पालिकेचे मोठे पाऊल

**पुणे, दि. २२ : प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमधील २० जागा पाण्याच्या टाक्या बांधण्यासाठी देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या गावांमधील सुविधा क्षेत्राच्या (ॲमेनिटी स्पेस) जागा ताब्यात आलेल्या आहेत. त्यातील जागा पाण्याच्या टाक्या बांधण्यासाठी दिल्या जाणार आहेत. या टाक्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर तेथे सुमारे साडेतीन लाख लिटर पाण्याचा साठा करता येणार असून, यामुळे जवळपासच्या भागातील पाणीपुरवठ्यातील अडचणी दूर होणार आहेत.

पुणे महापालिकेच्या हद्दीत ३४ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे. यापैकी ११ गावे २०१७ साली तर २३ गावे २०२१ मध्ये महापालिकेच्या हद्दीत आली. यातील फुरसुंगी आणि उरळी देवाची ही दोन गावे वगळून तेथे स्वतंत्र नगरपरिषद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून त्याचा अध्यादेशदेखील काढण्यात आला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत महापालिकेच्या हद्दीत समावेश झालेल्या गावांची संख्या ३२ इतकी आहे.

पुणे महापालिकेच्या हद्दीत आलेल्या या गावांमध्ये सध्या उपलब्ध असलेले जलस्रोत आणि टँकर या माध्यमातून पाणी दिले जाते. येथील नागरिकांना महापालिकेतील इतर भागातील रहिवाशांप्रमाणेच पाणी मिळावे, यासाठी महापालिकेने येथे पाणीपुरवठा योजनेचा आराखडा तयार करण्याचे काम हाती घेतले. यापैकी वाघोली, लोहगाव, सूस म्हाळुंगे, बावधन येथील पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू झाले आहे. पाण्याच्या टाक्यांसाठी जागा मिळाव्यात, अशी मागणी पाणीपुरवठा विभागाने महापालिका आयुक्तांकडे केली होती. महापालिकेत सुविधा क्षेत्र समितीची बैठक झाली. यामध्ये आठ गावातील २० जागा पाण्याच्या टाक्या बांधण्यासाठी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या जागांवर पाणीपुरवठा विभागाच्या माध्यमातून टाक्यांची कामे केली जाणार आहेत.

या बैठकीत आंबेगाव खुर्द आणि आंबेगाव बुद्रूक, सूस, म्हाळुंगे, बावधन, जांभूळवाडी, लोहगाव, वाघोली या गावांत जागा पाण्याच्या टाक्या बांधण्यासाठी मिळाल्या आहेत. या जागा पाणीपुरवठा विभागाकडे आल्यानंतर आवश्यक ती सर्व प्रक्रिया पूर्ण करून त्या ताब्यात घेतल्या जातील. त्यानंतर तेथे पाण्याची टाकी बांधण्याचे काम सुरू केले जाणार आहे.

याबाबत अधिक माहिती देताना पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप म्हणाले, समाविष्ट गावांमध्ये आवश्यक असलेला पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेने आराखडे तयार केले आहेत. पाणीपुरवठ्याच्या काही योजनांचे काम देखील सुरू करण्यात आले आहे. ज्या भागात पाणीपुरवठा केला जातो तेथे एकूण पाणीपुरवठ्याच्या एक तृतीयांश पाणी साठा होईल इतक्या क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे आवश्यक आहे. टाकी बांधण्यासाठी २० जागा देण्याचा निर्णय झाला आहे. याचा मोठा फायदा त्या गावांमध्ये पाणीपुरवठा करण्यासाठी होणार आहे.

## डोंबिवलीत सहा बांगलादेशी नागरिकांना अटक

**डोंबिवली, दि. २२ : प्रतिनिधी**

येथील मानपाडा पोलीस ठाणे हद्दीत भारतात बेकायदा वास्तव्य करत असलेल्या सहा बांगलादेशी नागरिकांना मानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडे भारतात वास्तव्य करण्याचे कोणतेही अधिकृत कागदपत्रे आढळून आले नाहीत, असे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

दोन दिवसापूर्वी कल्याण पूर्वेत विठ्ठलवाडी भागात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या एका बांगलादेशी पती, पत्नीला उल्हासनगर गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. ते मागील सात वर्षापासून कल्याणमध्ये राहत होते. पती एका वाहनावर चालक, तर पत्नी एका हॉटेलमध्ये सेविका म्हणून काम करत होती.

मानपाडा पोलिसांना आपल्या पोलीस ठाणे हद्दीत बांगलादेशी नागरिक राहत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. पोलिसांनी या माहितीची खात्री केल्यावर त्यांना सहा बांगलादेशी राहत असल्याचे समजले. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून या सहा बांगलादेशींना ताब्यात घेतले.त्यांच्याकडे भारतात राहण्यासाठीचे पारपत्र, व्हिसा आणि नागरिकत्व कागदपत्रांची मागणी केली असता पोलिसांना ते एकही कागदपत्र देऊ शकले नाहीत. बिसू शेख, रुमान पोकीर, दिलावर हुसेन, आरीफ मुल्ला, आरीफ मोफिजून, एक अज्ञात महिला यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी या सहा जणांविरुध्द कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. त्यांना न्यायालयात हजर केले जाणार आहे, असे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

## स्टेरॉईड इंजेक्शनची बेकायदेशीर विक्री, दोन जणांवर गुन्हा दाखल

**पुणे, दि. २२ : प्रतिनिधी**

शहरातील विविध व्यायामशाळांमध्ये ( जिम) व्यायाम करणाऱ्या तरुणांना शरीरयष्टी चांगल्याप्रकारे व्हावी या उद्देशाने स्टेरॉईड इंजेक्शन मेफेटर्मिन सल्फेट इंजेक्शन बेकायदेशीररित्या विक्री केल्याप्रकरणी दोन जणांवर शिवाजीनगर पोलिसांनी कारवाई केली आहे. याप्रकरणी आरोपींवर गुन्हा देखील दाखल करण्यात आला असून आरोपींच्या ताब्यातून पाच हजार रुपयांचे बेकायदेशीर १४ स्टेरॉईड इंजेक्शन जप्त करण्यात आली आहे. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांनी ही माहिती दिली. या प्रकरणात दीपक बाबुराव वाडेकर ( वय ३२, रा.खडकी) आणि साजन अण्णा जाधव (वय २५, रा. औंध) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस हवालदार तेजस रमेश चोपडे यांनी तक्रार दाखल केलेली आहे. संबंधित आरोपी हे नरवीर तानाजी वाडी येथील इराणी वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका मोटारीमध्ये बेकायदेशीर स्टेरॉईड इंजेक्शन घेऊन थांबले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. आरोपींकडे औषधे बिल नसताना औषध घेणाऱ्या व्यक्तीच्या जीवीतास धोका किंवा आरोग्यास गंभीर इजा होऊ शकते हे माहिती असतानाही संबंधित औषधे अवैधरीत्या प्राप्त करून गैरवापर करण्याचे उद्देशाने जवळ बाळगल्याचे दिसून आले. संबंधित इंजेक्शन त्यांनी कोठून आणले, ते कोणाला विक्री करणार होते, त्यांचे अन्य साथीदार कोण आहेत याबाबत पुढील तपास शिवाजीनगर पोलीस करत आहे.

# भिवंडीत उर्दू शाळेत मराठी वकृत्व स्पर्धा संपन्न




**भिवंडी, दि. २२ : प्रतिनिधी**

भिवंडी सारख्या बहुभाषिक शहरात उर्दू शाळा व्यवस्थापना कडून तब्बल ५० वर्षे मराठी वकृत्व स्पर्धा भरवणे हे प्रशंसनीय असल्याचे उद्गार टोरंट पॉवर कंपनीचे उप व्यवस्थापक सुधीर देशमुख यांनी काढले. ते भिवंडी व्हीवर्स एज्युकेशन सोसायटीच्या समदिया उर्दू हायस्कूलच्या माध्यमातून मराठी वकृत्व स्पर्धा प्रसंगी बोलत होते.संस्थाध्यक्ष डॉ.अनिस अब्दुल रऊफ मोमीन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमास माजी प्राचार्य रामदास पाटील व पत्रकार संजय भोईर, शमा अवामी मदरसाचे सचिव फारुक गहलोत यांसह संस्था पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सुधीर देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करीत ५० वर्षे हा उपक्रम सुरू ठेवण्याचे शिवधनुष्य पेलल्या बद्दल संस्था चालकांचे कौतुक केले.तर उर्दू भाषिक शाळा असून ही मराठी वकृत्व स्पर्धेचा सुवर्ण महोत्सव साजरा केला जातोय हे गौरवास्पद असून भिवंडीत मराठी वकृत्व स्पर्धा आयोजित करून या शहराशी नाळ जोडणाऱ्या उपक्रमाची प्रशंसा करतानाच उर्दू भाषिक विद्यार्थ्यांनी सहअभिनय देहबोली ठेवत आपले विचार मराठी भाषेत ज्या आत्मविश्वासाने सादर केले त्याचे कौतुक करीत,ज्या राज्यात आपण राहतो त्या राज्याची राज्यभाषा आत्मसात करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन पत्रकार संजय भोईर यांनी केले.या स्पर्धेत शहरातील विविध शाळां मधील ३२ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्रक ,सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.तर यावेळी आंतर शालेय चित्रकला स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा सुध्दा गौरव करण्यात आला आहे.मुख्याध्यापक साजिद सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखाली स्पर्धा आयोजक जुल्फिकार शेख व नौशेर देशमुख,शेख अकील,मोमीन जमर,पिंजारी अकबर यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

## जिल्ह्यात यंदाच्या वर्षात 74 नव्या स्मार्ट अंगणवाड्या

**ठाणे, दि. २२ : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील बालकांना अंगणवाडीत येण्याची आवड निर्माण व्हावी, त्यांचा शैक्षणिक आणि बौद्धिक विकास व्हावा यासाठी जिल्ह्यातील अंगणवाड्या स्मार्ट करण्याकडे जिल्हा परिषदेचा विशेष कल आहे. ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात वर्षभरात ७४ नव्या स्मार्ट अंगणवाड्या सुरु झाल्या आहेत. या अंगणवाड्यांमध्ये बालकांच्या बौद्धिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची असणारी खेळणी, विविध शैक्षणिक तक्के, भिंतीवर विविध चित्र रेखाटली आहेत. तसेच टीव्हीच्या माध्यमातून या बालकांना विविध बालसाहित्य दाखविले जाते, अशी माहिती महिला व बालविकास विभागाच्या मार्फत देण्यात आली.

बालकाच्या वाढीचा आणि विकासाचा महत्त्वाचा टप्पा म्हणून अंगणवाडीकडे पाहिले जाते. वयाच्या सहाव्या वर्षापासून बालकाची शारीरिक, मानसिक आणि सामाजिक वाढ होण्यास सुरुवात होते. बालकांना या वयात शाळेत बसण्याची सवय, अक्षरांची ओळख व्हावी यासाठी पालक आपल्या पाल्याला अंगणवाडीमध्ये पाठवत असते. ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात पूर्वी या अंगणवाड्यांची दुर्दशा होती. त्यामुळे या अंगणवाड्यांमध्ये फारसे बालक जात नव्हते. परंतु, कालांतराने या आंगणवाड्यांचे रुपडे पालटले. आता, या अंगणवाड्यांची वाटचाल स्मार्ट होताना दिसत आहे. जिल्ह्यात वर्षभरापूर्वी केवळ ४९७ स्मार्ट अंगणवाड्या होत्या. त्यात, यंदाच्या वर्षी आणखी ७४ स्मार्ट अंगणवाड्यांची वाढ झाली आहे. या अंगणवाड्यांमध्ये टिव्ही, भितींवर विविध प्राण्यांची – पक्ष्यांची चित्र रंगवलेली, बालकांना बसण्यासाठी खुर्च्या, इंग्रजी, मराठी अक्षरांचा तक्ता, खेळण्याचे विविध साहित्यासह सौरऊर्जा यंत्रणा, ई-लर्निंग, उपलब्ध आहेत. या अंगणवाड्या स्वयंसेवी संस्थाच्या मार्फत उभारण्यात आल्या आहेत.

## भिवंडी उपजिल्हा रुग्णालयात सिकल सेल नियंत्रण सप्ताह संपन्न

**भिवंडी, दि. २२ : प्रतिनिधी**

सिकल सेल आजाराबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी शहरातील स्व.इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयात अधीक्षका डॉ. माधवी पंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयोगशाळा विभागकडून सिकल सेल नियंत्रण सप्ताह साजरा करण्यात आला.शुक्रवारी या प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. माधवी पंदारे यांनी सिकल सेल आजार हा आनुवंशिक असून वाहक किंवा आजाराने प्रभावित व्यक्ती सिकल सेल बाधित नसलेल्या व्यक्ती सोबत विवाह केल्यास होणाऱ्या अपत्यास सिकल सेल आजार होण्याचा धोका असल्याचे सांगितले. दोन समान सम आजार असलेल्या व्यक्ती ने विवाह केल्यास होणाऱ्या अपत्त्यास देखील सिकल सेल आजार होऊ शकतो अशी माहिती यावेळी डॉ. माधवी पंदारे यांनी दिली आहे.या सप्ताह काळात सिकल सेल आजारावर नियंत्रण आणणे साठी सप्ताह कालावधीत ४९३ नागरिकांची रक्त तपासणी करण्यात आली.या सप्ताह काळात रुग्णांना सिकल सेल बाबतीत जनजागृती करीत सिकल सेल आजाराची,औषाधोपचाराची माहिती रुग्णांना देण्यात आली असून रुग्णालयात आलेल्या सर्व गरोदर मातांची सिकल सेल तपासणी करण्यात आली आहे.सिकल सेल नसलेल्या गरोदर माता आणि रुग्णांना पांढरे कार्ड वाटप करण्यात आले असून या तपासणीत ३ लागण झालेल्या रुग्णांचे रक्त नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.सिकल सेल नियंत्रण सप्ताह यशस्वी करण्यासाठी प्रयोगशाळा विभागाचे प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी देविदास शेटगे,अनिल वाघ, राजेंद्र शिंदे,परिचर ज्ञानेश्वर भोसले व महालॅबचे कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम 2024

**नवी मुंबई, दि. २२ : प्रतिनिधी**

कमीत कमी कालावधीत समाजातील निदान न झालेले क्षयरुग्ण शोधून त्यांना उपचाराखाली आणणे व क्षयरोगाबाबत समाजात जनजागृती करणे या उद्देशाने केंद्र व राज्य



शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दि. 23 डिसेंबर 2024 ते 03 जानेवारी 2025 या कालावधीत "सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम" नमुंमपाच्या अतिजोखमिच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत ही मोहिम शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अतिजोखमिच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार असून मा. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे याच्या मार्गदर्शनाखाली 80 पथकांच्या माध्यमातून एकूण 31803 घरांमध्ये अंदाजित एकूण 1,59,014 लोकसंख्येला भेटी देऊन नागरीकांची तपासणी करण्यात येणार असून तसेच क्षयरोगाबाबत जनजागृती देखील करण्यात येणार आहे. प्रत्येक पथकाने दररोज 40 ते 50 घरांना भेट देऊन माहिती संकलीत होईल अशा प्रकारे पथके तयार केली आहेत.

दोन आठवडयांपेक्षा जास्त खोकला, दोन आठवडयांपेक्षा जास्त ताप, वजनात लक्षणीय घट, थुंकीवाटे रक्त येणे, छातीत दुखणे, मानेवरील गाठ या लक्षणांबाबत विचारणा करण्यात येणार आहे. यामध्ये क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास संबंधितांची थुंकी नमुने आणि X-Ray द्वारे तपासणी करुन अंतिम निदान निश्चित करण्यात येणार आहे.

या मोहिमेमुळे क्षयरोगाच्या निदानाअभावी अद्यापही वंचित असणाऱ्या जास्तीत जास्त क्षयरुग्णांचा प्रशिक्षित पथकाद्वारे शोध घेऊन त्यांना क्षयरोग औषधोपचारावर आणणे हे उद्दीष्ट साध्य करण्यात येणार आहे. सदर मोहिमेमध्ये नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देऊन क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास थुंकी नमुने देऊन उद्दीष्ट साध्य करण्यात सहकार्य करावे असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांनी केवळ अन्नदाता नव्हे तर ऊजार्दाता इंधन दाता देखील व्हायला पाहिजे

**केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे आवाहन**



**भारतातील पहिल्या बायो बिटूमेन साम्रगीवर आधारित राष्ट्रीय महामागार्चं नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपुरातील मनसर राष्ट्रीय महामार्ग येथे उद्घाटन**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. २२ :** शेतकऱ्यांनी केवळ अन्नदाता नव्हे तर ऊजार्दाता इंधन दाता देखील व्हायला पाहिजे असे आवाहन केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी गडकरी यांनी आज केले.भारतातील पहिल्या बायो बिझ्रुमेन या साम्रगीवर आधारित राष्ट्रीय महामागार्चं उद्घाटन आज नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपुरातील मनसर राष्ट्रीय महामार्ग येथे झाले त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचे सहसचिव कमलेश चोधरी, केंद्रीय रस्ते संशोधन संस्था सीआरआरआयचे संचालक प्रो. मनोरंजन परिड़ा , राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य महाव्यवस्थापक आर.पी. सिंह उपस्थित होते.

पिकांच्या अवशेषांपासून - लिग्निन पासून बनवलेल्या बिझ्रुमेनचा वापर करून बांधलेला हा देशातील पहिला राष्ट्रीय महामार्ग आहे. बायो बिटुमेनपासून तयार झालेला हा रस्ता, पारंपारिक, डांबरापासून तयार झालेल्या रस्त्यापेक्षा, ४० टक्के सुरक्षित असून, डांबरात १५ टक्के बायो बिटूमेन मिसळून, नागपूर-मनसर, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पात, १ किलोमीटर लांबीची रस्ता निर्मिती करण्यात आल्याची माहिती गडकरींनी यावेळी दिली. बांबूपासून बायो सी.एन.जी. त्याचप्रमाणे, लिग्निनची निर्मिती करून, यापासून नवे उद्योग सुरू करता येतील. या पर्यावरणपूरक रस्ते निर्मितीपासून, रस्ते निर्मितीच्या खर्चात कपात होईल, रोजगार निर्मिती होईल तसंच शेतमालाच्या ज्वलनापासून होणाऱ्या प्रदूषणाला आळा बसेल असे त्यांनी सांगितले.भारत कृषीप्रधान देश असल्यामुळे पिकांसोबतच त्यांचे अवशेष देखील मोठ्या प्रमाणात शिल्लक राहतात. ते जाळल्यामुळे पर्यावरणाचं नुकसान होतं. त्याचप्रमाणे देशात सुमारे २५ हजार कोटी रुपयाचे बिटूमेन आयात होते.या पारंपारिक बिटूमन वरील अवलंबत्व कमी करण्यासाठी बायोबिटूमीनचे पारंपारिक बिटूमेन मध्ये मिश्रण करणे फक्रायद्याचे ठरते. यामुळे रस्ते बांधणीत सुद्धा खर्च कमी येतो असे त्यांनी यावेळी नमुद केले. रामटेक, भंडारा सारख्या तांदुळ उत्पादक पट्ट्यात भात शेतीनंतर उरणाऱ्या राईस स्ट्रा, हस्क पासून सीएनजी आणि बिटुमन बनविण्याची क्षमता आहे . बांबू पासून बायो सीएनजी त्याचप्रमाणे लिग्निनची निर्मिती करून या तंत्रज्ञावर आधारित नवे उद्योग सुरू करता येतील . भंडारा-गोंदिया यासारख्या धान उत्पादक जिल्ह्यांना यामुळे नवी दिशा मिळेल. गडकरींनी सांगितले .

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राज इंडस्ट्रीज चे प्रमुख अतुल मुळे यांनी केले त्याचप्रमाणे प्राज इंडस्ट्रीजचे मुख्य वैज्ञानिक सिद्धार्थ पाल आणि अंबिका बहेल यांनी या संशोधनाविषयी सविस्तर माहिती दिली .या कार्यक्रमाला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्राज बायोटेक इंडस्ट्रीजचे पदाधिकारी आणि अधिकारी उपस्थित होते.

# खासदार क्रीडा महोत्सवाच्या कार्यालयाचे उद्घाटन




■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. २२ :** केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या सहाव्या खासदार क्रीडा महोत्सवाच्या सीताबर्डी येथील ग्लोकल मॉल मधील विभागीय कार्यालयाचे शनिवारी गुरुवार २१ डिसेंबर २०२४ रोजी आमदार श्री प्रवीण दटके यांच्या हस्ते उद्घाटन झाले. याप्रसंगी क्रीडा क्षेत्रातील मानाचे दादोजी कोंडदेव पुरस्कार, अर्जुन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार, छत्रपती पुरस्कार असे चारही पुरस्कार विजेते श्री विजय मुनीश्वर, माजी महापौर श्रीमती अर्चना डेहनकर, माजी क्रीडा सहसंचालक श्री जयप्रकाश दुबळे, माजी नगरसेवक श्री. संजय बंगाले, खासदार क्रीडा महोत्सवाचे सचिव डॉ. पीयूष आंबुलकर उपस्थित होते. नागपूर शहरासह विदभार्तील खेळाडूंच्या प्रतिभेला व्यासपीठ मिळवून देणाऱ्या खासदार क्रीडा महोत्सवाला लवकरच सुरूवात होणार आहे. खेळाडूंना नोंदणी तसेच अन्य महत्वाची माहिती मिळविण्यासाठी खासदार क्रीडा महोत्सवाच्या कार्यालयाची मोठी मदत होते. या कार्यालयाच्या उद्घाटनानंतर आयोजित आमदार श्री. प्रवीण दटके यांनी खासदार क्रीडा महोत्सव हा खेळातून ध्येयाकडे प्रेरीत करणारा महोत्सव असल्याचे सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे खेळाकडून ध्येयाकडे वाटचाल आणि त्यातून हिंदवी स्वराज्याची संकल्पना पूर्णत्वास नेली. तोच आदर्श पुढे नेत केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी यांनी देशातील सर्वात मोठा क्रीडा महोत्सव आयोजित करून तरुणांना ध्येयाकडे वाटचाल करण्यास प्रेरित केल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविकामध्ये खासदार क्रीडा महोत्सवाचे सचिव डॉ. पीयूष आंबुलकर यांनी महोत्सवाच्या वाटचालीची माहिती दिली. २०१८ चा पहिला खासदार क्रीडा महोत्सव २० दिवसांचा होता. यात ३० क्रीडांगणांवर २० खेळ, २९२ स्पर्धा, ५४० चमू, ८८० प्रशिक्षक, १५०० ऑफिशियल्स आणि २५ हजार खेळाडूंचा समावेश होता. या क्रीडा महोत्सवात ४३ लक्ष ८० हजार २०० रुपयांचे पुरस्कार प्रदान करण्यात आले होते.

तर मागील वर्षी २०२२ साली झालेल्या पाचव्या खासदार महोत्सवात १५ दिवसांत ४९ क्रीडांगणांवर ३५ खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यात २२८० चमूंनी सहभाग घेतला. ५००० ऑफिशियल्स आणि ५४ हजार खेळाडूंचा सहभाग होता. महोत्सवात १ कोटी ३० लक्ष ८७ हजार रुपयांचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. मागील पाच वर्षांचा महोत्सवाच्या प्रवासाचा आढावा घेता महोत्सवाला प्राप्त होत असलेले भव्य स्वरूप आता केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनात पुढे अधिक भव्यदिव्य होईल, असा विश्वास डॉ. पीयूष आंबुलकर यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे संचालन महोत्सवाचे सदस्य श्री. नीरज दोंतुलवार व आभार डॉ. अशफाक शेख यांनी मानले. यावेळी खासदार क्रीडा महोत्सवाचे कोषाध्यक्ष आशिष मुकीम, सदस्य नागेश सहारे, डॉ. संभाजी भोसले, नवनीत सिंग तुली, डॉ. विवेक अवसरे, सचिन देशमुख, अशफाक शेख, अमित संपत, सतिश वडे, सचिन माथने, सुनील मानेकर,

# पोलिस व्यस्त, गुन्हेगार मस्त

## दुहेरी हत्याकांड, दरोड्याच्या घटनांनी हादरले शहर

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. २२ :** हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शहरात कडेकोट बंदोबस्त होता. पोलिसांची ह्यचप्पे-चप्पेपर नजर असल्याचा दावा केला जात होता. अशातच दुहेरी हत्याकांड, लाखोंचा दरोडा व इतर गंभीर घटनांनी पोलिसांच्या दाव्याची पोलखोल केली. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून शहरात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलिसांचे सर्व लक्ष व्हीआयपींच्या सुरक्षेवर केंद्रित होते. व्हीआयपींच्या सुरक्षेत पोलिस इतके व्यस्त होते की त्यांना शहरातील नागरिकांचा विसर पडला होता.

यावर्षी शहरात हिवाळी अधिवेशन होईल किंवा नाही याबाबत संभ्रम होता, मात्र पोलिस विभागाने हिवाळी अधिवेशनासाठी आधीच तयारी सुरू केली होती. रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर कोम्बिंग ऑपरेशन राबवून प्रतिबंधक कारवाई करण्यात आली, तर अवैध धंदे करणाऱ्यांच्याही मुसक्या आवळण्यात आल्या. अधिवेशना दरम्यान शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिस सतर्क असल्याचे सांगण्यात येत होते. मात्र मायबाप सरकार शहरात असताना अजनीत दुहेरी हत्याकांड, कपिलनगरात सशस्त्र दरोडा, इतवारीत २४ लाखांची धाडसी घरफोडी, पेट्रोल पंपावरील महिला कर्मचाऱ्याशी गैरवर्तन आदी घटनांनी शहराला हादरवून सोडले. या घटनांमुळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. तर गुन्हेगारांनी पुन्हा एकदा कायद्याची भीती नसल्याचे दाखवून दिले आहे. यावरून पोलिस व्हीआयपींच्या बंदोबस्तात व्यस्त तर गुन्हेगार गुन्हे करण्यात मस्त असे चित्र शहरात निर्माण झाले होते.

### जुन्या वैमनस्यातून बापलेकाचा खून

अजनी पोलिस ठाण्यांतर्गत रामटेकेनगर टोलीत शुक्रवारी सायंकाळी ५ जणांनी मिळून विजय बजरंग सावरकर आणि त्याचा मुलगा मयूर विजय सावरकर या बापलेकाची शस्त्राने सपासप भोसकून हत्या केली. भररस्त्यावर घडलेल्या या घटनेत वेळेत उपचार न मिळाल्याने दोघांचाही मृत्यू झाला होता. दोघेही बराच वेळपर्यंत रस्त्यावर पडून होते, अशी माहिती मिळाली आहे. अशात पोलिस कुठे होते? हत्येची माहिती मिळताच ते घटनास्थळी का पोहोचले नाही? पोलिसांनी वेळेत घटनास्थळ गाठून जखमींना उपचारार्थ रुग्णालयात नेले असते तर कदाचित त्यांचा जीव वाचू शकला असता. विशेष म्हणजे या घटनेतील मुख्य आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. तो जुगार, सट्टापट्टी आणि खुनाच्या घटनांत सक्रीय आहे. यावरून पोलिसांनी कोणत्या गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारवाई केली असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. तसेही रामटेकेनगर टोली हा शहरातील संवेदनशील भाग आहे. अशात चप्पे-चप्पेवर नजर ठेवणाऱ्या पोलिसांकडून हा चप्पा कसा सुटला असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### दिवसाढवळ्या घरात घुसून लुटले

पारडी ठाण्यांतर्गत दुर्गानगर परिसरात धनंजय पांडे हे कुटुंबासह राहतात. दुपारच्या सुमारास संपूर्ण कुटुंब घरी असताना एक आरोपी त्यांच्या घरात घुसला. चाकूचा धाक दाखवून आरडा-ओरड करण्यास मनाई केली. त्यानंतर घरातील मौल्यवान वस्तू कुठे आहेत, याबाबत विचारणा केली. या दरम्यान धनंजय यांनी त्याला विरोध केला असता चाकूने वार करून जखमी केले. त्यानंतर धनंजय यांच्या खिशातील पैसे हिसकावून पळ काढला. पांडे कुटुंबीयांनी मदतीसाठी आरडा-ओरड केली असता वस्तीतील नागरिकांनी त्याला पकडून पोलिसांच्या स्वाधिन केले. भरदुपारी ही घटना घडल्याने परिसरातील नागरिकांमध्ये खळबळ उडाली होती. भरदुपारी लोकांच्या घरात घुसून गुन्हेगार अशाप्रकारे लुटपाट करीत असतील तर पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण होतो. गुन्हेगारांवर पोलिसांची वचक नसल्याचे या घटनेवरून दिसून येत आहे. विशेष म्हणजे चौकशीत आरोपीने पारडी ठाण्यांतर्गतच यापूर्वी अशाच प्रकारचे आणखी चार गुन्हे केल्याची कबुली दिली.

### केबल व्यावसायिकाच्या घरून २४ लाखांचा माल चोरी

इतवारी सारख्या दाट लोकवस्तीच्या परिसरात चोरांनी केबल व्यवसायी राजेश जैन यांच्या घरी चोरी केली. त्यांच्या आई-वडिलांच्या खोलीतील कपाटातून २० तोळे सोने आणि ९ लाख रोख घेऊन पसार झाले. घटनेच्या वेळी राजेश हे संपूर्ण कुटुंबासह लहान भावाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी भंडारा मार्गावरील एका फार्महाऊस मध्ये गेले होते. हजारो पोलिसांच्या बंदोबस्त असतानाही शहराची मुख्य बाजारपेठ असलेल्या इतवारी परिसरात ही घटना घडणे आश्चर्यकारकच आहे. या घटनेवरून कुठे होते पोलिस? आणि कुठे होती त्यांची गस्त? असे प्रश्न निर्माण होत आहेत.

### पेट्रोल पंपावरील महिला कर्मचाऱ्याशी गैरवर्तन

**हिंगणा मार्गावर आयसी झोन चौकातील पेट्रोल पंपावर काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्याशी काही आरोपींनी गैरवर्तन केले. कुत्रा भुंकत अंगावर धावून आल्याने पंपावर पेट्रोल भरण्यासाठी आलेल्या आरोपीने शिविगाळ सुरू केली. महिला कर्मचाऱ्याने शिविगाळ करण्यास मनाई केली असता आरोपीने महिलेलाही शिविगाळ केली आणि अश्लील टिप्पणी करून निघून गेला. काही वेळाने तो साथीदारांसह पुन्हा पंपावर परतला. महिलेला धमकावून पायावर डोके ठेवून साष्टांग नमस्कार करण्यास भाग पाडले. इतकेच नाहीतर याचा व्हीडिओ बनवून सोशल मीडियावर व्हायरल केला. या घटनेवरून शहरातील गुन्हेगारांची हिंमत किती वाढली आहे याची प्रचित येते.**

### कपिलनगरात १४ लाखांचा दरोडा

**कुटुंब गाढ झोपेत असताना काही मुखवटाधारी दरोडेखोर घरात घुसले. शस्त्राचा धाक दाखवून पतीपत्नी आणि मुलीला जिवे मारण्याची धमकी दिली आणि १६४ ग्रॅम सोने, ६ लाखांची रोकड आणि २५० ग्रॅम चांदी असा जवळपास १४ लाख रुपयांचा माल लुटून फरार झाले. ही खळबळजनक घटना कपिलनगर पोलिस ठाण्यांतर्गत खसाळा-मसाळाच्या माँ जगदंबानगर परिसरात घडली होती. अधिवेशना दरम्यान घडलेल्या या घटनेने शहरात चांगलीच खळबळ उडाली होती तर पोलिसांनाही घाम फोडला होता. या घटनेतील आरोपींना पकडण्यात अद्यापही पोलिसांना यश आलोले नाही.**

# केबल व्यावसायिकाच्या घरी चोरी

**२४ लाखांच्या मालावर डल्ला, इतवारी परिसरात खळबळ**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. २२ :** क्राईम रिपोर्टर. इतवारी परिसरात चोरांनी एका केबल व्यावसायिकाचे घरफोडून २४ लाख रुपयांच्या मालावर डल्ला मारला. गुरूवारी सकाळी ही घटना उघडकीस येताच परिसरात एकच खळबळ उडाली. दाट लोकवस्तीच्या या भागात चोरीची घटना घडणे आश्चर्यकारकच आहे. या प्रकरणी लकडगंज पोलिसांनी राजेश जैन रा. जुना बस स्टॅण्डच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

राजेश यांचा केबलचा व्यवसाय आहे. जुना बस स्टॅण्ड परिसरात त्यांचे घर आहे. आई-वडील तळ माळ्यावर तर ते कुटुंबासह वरच्या माळ्यावर राहतात. बुधवारी राजेश यांचे लहान भाऊ मुकेश यांच्या लग्नाचा २५ वा वाढदिवस होता. त्यामुळे भंडारा मार्गावरील एका फक्रार्महाऊसमध्ये समारंभ आयोजित करण्यात आला होता. राजेश आणि त्यांचे संपूर्ण कुटुंब समारंभासाठी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपींनी मध्यरात्रीच्या सुमारास मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. आई-वडिलांच्यखोलीतील कपाटातून २० तोळे सोने आणि ९ लाख रोख चोरी करून पसार झाले. गुरूवारी सकाळी ११ वाजता शेजाऱ्यांना राजेश यांच्या घराचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी तत्काळ राजेश यांना फोन करून घटनेची माहिती दिली. जैन कुटुंब तत्काळ घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. लकडगंज पोलिस घटनास्थळी पोहोचले.

### आरोपींचा सुगावा लावण्यात अडचण

राजेश यांच्या घरी सीसीटीव्ही नसल्याने फुटेज मिळू शकले नाही. मात्र पोलिसांनी शेजाऱ्याकडील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता दोन आरोपी मध्यरात्रीच्या सुमारास चोरी करून पळताना दिसत आहेत. फुटेजमध्ये आरोपींचे चेहरे स्पष्ट दिसत नसल्याने त्यांची ओळख पटविण्यात अडचण येत आहे. सध्या पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### के वळ आई-वडिलांच्या खोलीचे कपाट उघडले

तपासा दरम्यान एक विशेष बाब पोलिसांच्या लक्षात आली. आरोपींनी केवह राजेश यांच्या आई-वडिलांच्या खोलीतील कपाट उघडले होते. दुसरी कोणतीही खोली किंवा कपाट त्यांनी हुडकले नव्हते. यावरून त्यांना रोकड आणि दागिने कुठे आहेत याची पूर्ण कल्पना होती, असे दिसून येत आहे. इतक्या दाट लोकवस्तीच्या परिसरात मोठ्या सतर्कतेने ही चोरी करण्यात आली. त्यामुळे कोणाच्या तरी टिपवरून ही चोरी करण्यात आल्याचा संशय पोलिसांना आहे. कुटुंबाला चांगल्याने ओळखणाऱ्या व्यक्तीने ही टिप दिल्याचा अंदाज आहे.

# घरात घुसून लुटले, नागरिकांनी चोपले

**पारडी ठाण्यांतर्गत घटना, आणखी ४ गुन्हे उघडकीस**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. २२ :** दिवसाढवळ्या घरात घुसून कुटुंबाला चाकूच्या धाकावर लुटून पळालेल्या आरोपीस वस्तीतील नागरिकांनी पकडून चांगला चोप दिला आणि नंतर पोलिसांच्या स्वाधिन केले. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी धनंजय गणेश पांडे (४३) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. नीलेश सुधाकर पुरूषोत्तमवार (३३) रा. रवींद्रनगर, बल्लारपूर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. धनंजय पांडे हे कुटुंबासह पारडीच्या दुर्गानगर परिसरात राहतात. सोमवारी दुपारी ते घरी असताना आरोपी नीलेश चुपचाप त्यांच्या घरात घुसला. पांडे कुटुंबाला चाकू दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली. धनंजय यांनी विरोध केला असता आरोपीने चाकू मारून त्यांना जखमी केले आणि खिशातील ३.२७० रुपये जबरीने हिसकावून पळ काढला. याच दरम्यान पांडे कुटुंबाने मदतीसाठी आरडा-ओरड केली. परिसरातील नागरिक मदतीला धावले. पाठलाग करून नीलेशला पकडण्यात आले. चांगला चोप दिल्यानंतर पोलिसांना सूचना देण्यात आली. पारडी पोलिस घटनास्थळी पोहोचले. नीलेशविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा नोंदवून त्याला अटक केली. सखोल चौकशीदरम्यान आरोपीने आणखी चार ठिकाणी असाच गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून लुटीचे ८१,४७० रुपये जप्त केले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

# सरकारपासून हत्याकांड लपविण्याचा प्रयत्न

**रुग्णालयात नेण्यापूर्वीच झाला मृत्यू, पोलिस म्हणाले उपचार सुरू**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. २२ :** क्राईम रिपोर्टर. विधानसभेच्या हिवाळी अधिवेशना दरम्यान अजनी ठाण्यांतर्गत रामटेकेनगर टोलीत शुक्रवारी सायंकाळी दुहेरी हत्याकांडाची खळबळजनक घटना घडली. ५ हल्लेखोरांनी बापलेकावर शस्त्रांनी वार करून गंभीर जखमी केले. रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच दोघांचाही मृत्यू झाला, मात्र सरकारपुढे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी ही घटना लपविण्याचा भरपूर प्रयत्न केला.

रात्री उशिरापर्यंत पोलिस दोन्ही जखमींवर उपचार सुरू असल्याचे सांगत होते, जेव्हाकी ६ वाजताच्या सुमारासच दोघांचेही मृतदेह मेडिकल रुग्णालयाच्या शवविच्छेदन कक्षात दाखल करण्यात आले होते.

शवविच्छेदन गृहात कोणत्या रुग्णावर उपचार होतात हे पोलिसांनाच माहित, मात्र या घटनेत पोलिसांचा मोठा निष्काळजीपणा पुढे आला आहे. वैमनस्यातून मयूर विजय सावरकर (२७) आणि त्याचे वडील विजय बजरंग सावरकर (५४) यांचा खून करण्यात आला. या हत्याकांडात शुभम गणेश कुवेर्ती (१९), बादल गणेश कुवेर्ती (२१), सुमित उफर्क डंब्या भोला श्रीवास (२०), संदीप नाडे आणि सोहम अर्जुनवारसह इतरांचा समावेश आहे.

एका अल्पवयीनला पोलिसांनी घटनास्थळावरूनच ताब्यात घेतले होते. त्याला बाल सुधारगृहात रवाना करण्यात आल असून हल्लयादरम्यान जखमी झालेल्या आरोपी बादल याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शुभम आणि मयूर यांच्यात गत दोन महिन्यांपासून वैमनस्य होते. गुरूवारी सायंकाळीही मयूरने शुभमवर लोखंडी रॉडने हल्ला करून जखमी केले होते. पोलिसांनी गुन्हाही नोंदविला होता. मयूरविरुद्ध खून, मारहाण, आर्म्स अक्टसह इतर गंभीर गुन्हे नोंद होते.

त्यामुळे पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा नोंदविण्यासोबतच प्रतिबंधक कार्यवाहीही करायला पाहिजे होती. मात्र मोकाट फिक्ररत होता. शुक्रवारी सायंकाळी त्याने आपल्या दुकानाजवळच शुभमचा भाऊ बादल याच्यावर लोखंडी रॉडने हल्ला केला. याची माहिती मिळताच शुभम, संदीप नाडे, सुमित, सोहम आणि इतर आरोपी मयूरच्या दुकानात पोहोचले. मयूर आणि त्याचे वडील विजय यांच्यावर शस्त्र आणि दांड्याने हल्ला करून गंभीर जखमी केले.

हिवाळी अधिवेशनादरम्यानच दुहेरी हत्याकांडाच्या घटनेने पोलिसांनाही घाम फोडला. संपूर्ण सरकार आणि विपक्ष शहरात असल्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक होते. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत पोलिस दोन्ही जखमींवर उपचार सुरू असल्याचे सांगत होते.

जेव्हा की सायंकाळी ६ वाजताच विजयचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शवविच्छेदन कक्षात दाखल करण्यात आला होता. याच्या ४ मिनिटानंतरच मयूरचा मृतदेहही दाखल करण्यात आला. संदीप नाडे हा टोली परिसरातील चर्चित गुंड आहे.

त्याच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न, मारहाण, आर्म्स ॲक्ट, जुगार, सट्टापट्टी आणि दंगा करण्यासह १५ गुन्हे नोंद आहेत. त्याचेही मयूरशी वैमनस्य असल्याचे सांगण्यात येत




# व्यसनमुक्त धोरणाची अंमलबजावणी व्हावी

**पत्रकार परिषद आणि निदर्शनात मागणी, व्यसनमुक्त महाराष्ट्रसमन्वय मंच**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. २२ :** महाराष्ट्रसरकारनेस्वीकारलेलेव्यसनमुक्तीधोरण २०११ ची अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा निर्माण करून कार्यवाही करावी. तसेच व्यसनमुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी व्यसनमुक्त महाराष्ट्र समन्वय मंचाने महाराष्ट्र विधिमंडळ हिवाळी अधिवेशना दरम्यान नागपूर येथे निदर्शने केली. मंचाच्या पुढाकाराने पंचशील चौक, मेहाडिया चौक, भोले पेट्रोल पंप चौकात मागण्यांसाठी निदर्शने करण्यात आली. प्रतिनिधीमार्फत सरकारला निवेदन देण्यात आले. यासंबंधी पत्रपरिषद झाली. यावेळी मंचाचे निमंत्रक अविनाश पाटील, विदर्भ विभाग संघटक गौरव आळणे, मंचाचे कार्यकर्ते संदीप के, प्रदीप हिवाळे, विशाल विमल उपस्थित होते. 'सरकारने भारतीय संविधानातील ४७ व्या कमलानुसार व्यसनाचे नियंत्रण, निर्धारण धोरण राबविण्याची गरज आहे. मात्र व्यसनाच्या विळख्यातून महाराष्ट्राला बाहेर काढण्या ऐवजी दारू, तंबाखू, ड्रग्सच्या खाईत अधिकाधिक लोटणारे अत्यंत समाज घातकी निर्णय सरकारने घेतले आहेत. त्याचा आम्ही व्यसन मुक्त महाराष्ट्र समन्वय मंचाच्या वतीने जाहीर निषेध व विरोध करीत आलो आहोत', असे प्रतिपादन मंचाचे निमंत्रक अविनाश पाटील यांनी परिषदेत केले. केंद्राच्या नशा मुक्त भारत धर्तीवर व्यसन मुक्त महाराष्ट्र अभियान राबवावे. दारू, गुटखा बंदी ड्रग्ज सोबतच याबाबतचे धोरणाचे पुनर्निधारण करावे. महाराष्ट्रदारूबंदी कायदा विषयक कायदेतज्ञ व व्यसन मुक्तीतील प्रमुख कार्यकर्त्यांची आढावा समिती नेमण्यात यावी. वैध दारू विक्रीचे परवाने असलेल्या दुकाने, हॉटेलांमधून अल्पवयीन मुलांच्या व्यसनातून गुन्हेगारी, अपघातानंतर नियंत्रणासाठी असलेल्या कायद्यांची कठोर अंमलबजावणी करावी. अवैध दारू निर्मिती, वितरण आणि विक्रीचे संपूर्णता निर्मूलन करण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करावी. चंद्रपूर जिल्ह्यातील लोक आग्रहाने लागू झालेली दारू बंदी उठविण्याचा निर्णय त्वरित मागे घ्यावी. धान्यापासून दारू निर्मितीला दिलेल्या परवानगी रहित कराव्यात.

# कलावंतांच्या मानधनात दजार्नुसार वाढ करा

**भारतीय कलाकार शाहीर मंडळाची विधिमंडळावर धडक**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. २२ :** वरिष्ठ कलाकारांचे मानधन अ, ब आणि क दजार्नुसार वाढविण्यात यावे. तसेच त्यांना ८ हजार, ९ हजार आणि १० हजार रुपये मानधन देण्यासह विविध मागण्या घेऊन महाराष्ट्र शाहीर परिषद आणि अखिल भारतीय कलाकार शाहीर मंडळाने विधिमंडळावर मोर्चा काढला. शनिवारी हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी धडकलेल्या मोर्चात महिला-पुरूष कलावंतांनी भजन, पोवाडा सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

प्रलंबित मागण्यांसाठी राजेंद्र बावणकुळे, डॉ. संजय ज्ञानेश्वर वांढरे, गणेश देशमुख, अरुण मेश्राम, भगवान लांजेवार, चिरकूट पुंडेकर आणि योगिता नंदनवार यांच्या नेतृत्वात यशवंत स्टेडियम येथून काढण्यात आलेला हा मोर्चा टेकडी मार्गावर थांबविण्यात आला. देशात अनेक शतकांपासून भजन, पोवाडा सादर करण्याची परंपरा आजही कायम आहे. खऱ्या अथार्ने या कलावंतांनी ही कला जोपासत अन्याय, अत्याचाराला वाचा फोडली. तसेच समाजात जनजागृतीचे काम केले. कला जिवंत ठेवणाऱ्या कलावंतांना तुटपुंज्या मानधनात कुटुंब चालवावे लागते. राज्य सरकारने कलावंतांच्या मानधनात वाढ करून ५ हजार रुपये केले, तर केंद्र सरकारने ६ हजारावरून १ हजार रुपये मानधन केले. हा कलावंतांवर केलेला अन्याय व अपमान आहे. तो दूर करण्यासाठी मानधनात वाढ करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यासोबतच मानधन मिळण्यासाठी राज्य सरकारची वयोमयार्दा ५०, तर केंद्र सरकारची ६० आहे. ही वयोमयार्दा सुद्धा कमी करण्यात यावी. कारण अनेक कलावंतांचा मानधनाच्या प्रतीक्षेत मृत्यू झाला आहे. कलेच्या माध्यमातून आयूष्यभर समाज जागविणाऱ्या या कलावंतांना मानधनाचा सुद्धा लाभ घेता आलेला नाही, अशी खंतही अनेक कलावंतानी यावेळी व्यक्त केली. मोर्चाच्या शिष्टमंडळाने नामदार सावे यांना निवेदन सादर केले. त्यांनी मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **PUSHPALATA PANDE.** NOW MY NEW NAME IS **PUSHPA SHARAD PANDE.**
**ADD.** : HOUSE NO.1680, OPP GS COMMRACE COLLEGE GOREPETH SHANKAR NAGAR NAGPUR.

# भुजबळांचे तिसरे बंड...



डिसेंबर १९९१. नागपूर येथे राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन चालू होते, तेव्हा काँग्रेसचे सरकार होते. अविभाजित शिवसेनेचे नेते मनोहर जोशी यांची विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी निवड केली, हेच नेमके छगन भुजबळांचे दुखणे होते. त्यांची मानसिकता व अस्वस्थता शरद पवार यांनी नेमकी हेरली व त्यांना शिवसेनेतून बाहेर येण्याचा मार्ग दाखवला. शिवसेनेत आक्रमक काम करूनही आपल्या मनासारखे होत नाही आणि दुसरीकडे शरद पवारांसारखा दिग्गज नेता आपल्या पाठीशी उभा आहे ही भावना भुजबळांमध्ये तीव्र बळावली व त्यांनी शिवसेनाप्रमुखांच्या विरोधातच बंडाचा झेंडा फडकवला. तेव्हा शिवसेनेचा मुंबईत जबरदस्त दबदबा होता. शिवसेनाप्रमुखांना आव्हान देणे सोपे नव्हते. शिवसैनिकांचा रोष काय असतो हे भुजबळांना चांगले ठाऊक होते. पक्षाच्या अठरा आमदारांना आपल्या बंडात बरोबर घेण्याची त्यांची तयारी झाली. (नंतर प्रत्यक्षात बारा आमदार आले) सभागृहातून भुजबळ हे त्यांच्या साथीदार आमदारांसह अचानक बेपत्ता झाले. ते सर्व कुठे गेले याची शोधाशोध सुरू झाली. त्यांच्या बंडाने शिवसेनाप्रमुखही जाम भडकले होते. त्या सर्व बंडखोर आमदारांची नागपूर जवळ असलेल्या पाटबंधारे विभागाच्या अतिथिगृहात व्यवस्था केली होती. तिथे कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तिथे कुणीही पोहोचू शकणार नाही अशी दक्षता घेण्यात आली होती. तिथे भुजबळांसह सर्व अस्वस्थ होते. शिवसेनेत बंड करून आणि शिवसेनाप्रमुखांना आव्हान देऊन मुंबईत राहणे हे सोपे नाही, हे सर्वांनाच ठाऊक होते. एकदा तरी बाळासाहेबांनी मला छगन म्हणून हाक मारावी असे स्वत: भुजबळ काकुळतीला येऊन सांगत होते, पण शिवसेनाप्रमुखांनी त्यांचा फोनही घेतला नाही आणि त्यांच्याशी शब्दही बोलले नाहीत. मग मात्र काँग्रेस पक्ष आणि शदर पवारांचे छत्र याशिवाय त्यांच्यापुढे कोणताच पर्याय उरला नाही. पुढे शिवसेनाप्रमुखांनी त्यांना लखोबा म्हणून कायमचे संबोधले पण काँग्रेसने मंत्रीपदाच्या मखरात बसवल्यावर भुजबळही शिवसेनाप्रमुखांना टी. बाळू असे उपहासात्मक बोलू लागले. ज्यांनी त्यांना दोन वेळा महापौर, आमदार केले त्यांच्याशीच भुजबळांनी पंगा घेतला. शिवसेनाप्रमुखांना बऱ्याच वर्षांपूर्वीच्या भाषणाबद्दल अटक करण्याचाही आराखडा रचला. ज्यांनी त्यांना मोठे केले, त्यांनाच जेलमध्ये पाठवायला भुजबळ आतुर झाले होते. पण न्यायालयानेच केस पहिल्या फटक्यात फेटाळून लावली.

आज तेहतीस वर्षांनंतर हेच भुजबळ, जहाँ नही चैना, वहाँ नही रहेना... असा सूर आळवत आहेत. तेव्हा बाळासाहेब ठाकरेंच्या विरोधात आणि आज अजितदादा पवारांच्या विरोधात ते तोफा डागत आहेत. तेव्हा विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद मिळाले नाही म्हणून आणि आता महायुतीच्या नव्या सरकारमध्ये मंत्रीपद मिळाले नाही म्हणून ते आक्रोश करीत आहेत. तीन दशकांपूर्वी त्यांनी बंड केले तेव्हा शरद पवारांची ताकद त्यांच्या पाठीशी होती. जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवारांच्या नेतृत्वालाच त्यांनी आव्हान दिले तेव्हा अजितदादांचे वलय आणि भाजपाचे संरक्षक कवच त्यांच्याबरोबर होते. आता भुजबळांनी अजितदादांच्याच विरोधात बंडाचा झेंडा फडकवला आहे, पण त्यांच्या पाठीशी नेमके कोण आहे, हे गूढ आहे. आपल्याला मंत्री करावे म्हणून स्वत: देवेंद्र फडणवीस आग्रही होते असे ते वारंवार सांगत आहेत. तसेच हम एक है तो सेफ हैं... अशी पंतप्रधान नरेंद्र मोदींची निवडणुकीतील आवडती घोषणा देत आहेत. त्यांना भविष्यात कोणाकडून काय किंमत मिळेल हे ठाऊक नाही पण अजितदादांना त्यांनी डोकेदुखी निर्माण केली आहे.

**महाराष्ट्रनामा**



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com

छगन भुजबळ ७७ वर्षांचे आहेत. ते मूळचे नाशिकचे. लहानपणीच आई-वडिलांचे कृपाछत्र गेल्यामुळे ते मुंबईला आले. गेल्या पन्नास वर्षांच्या त्यांच्या राजकीय जीवनातील हे त्यांचे तिसरे बंड आहे. जेव्हा त्यांच्या मनाविरुद्ध घडते किंवा त्यांना पाहिजे ते मिळत नाही, तेव्हा ते समता परिषदेची ढाल पुढे करतात. लहानपणी ते भायखळ्याच्या मंडईत भाजी विकायचे. वीर जिजाबाई टेक्निकल इन्स्टिट्यूटमधून त्यांनी इंजिनीअरिंगचा डिप्लोमा घेतला. तरुण वयात शिवसेनाप्रमुखांची शिवाजी पार्क मैदानावरील भाषणे ऐकून ते प्रभावीत झाले. १९७३ मध्ये ते मुंबई महापालिकेत शिवसेनेचे नगरसेवक झाले तेव्हापासून त्यांनी कधीच मागे वळून बघितले नाही. १९८५ मध्ये ते माझगावमधून आमदार म्हणून निवडून आले. माझगावमधून दोन वेळा आमदार झाले, दोन वेळा महापौर झाले पण बाळासाहेबांनी मनोहर जोशींना विधानसभेचे विरोधी पक्ष नेतेपदी नेमल्याने त्यांचे बिनसले. मग पुढचा प्रवास काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार व अजित पवार यांच्यासोबत सुरू झाला.

देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये ३९ मंत्र्यांचा दि. १५ डिसेंबरला नागपूर अधिवेशनाच्या पूर्व संध्येला शपथविधी झाला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ मंत्र्यांना संधी मिळाली. पण त्यात भुजबळ यांचे नाव नाही, त्यानंतर भुजबळांचा संताप सुरू झाला. शरद पवारांच्या पक्षात छगन भुजबळांना खूप महत्त्व दिले गेले. प्रदेशाध्यक्ष, उपमुख्यमंत्रीपद त्यांना मिळाले. ओबीसी नेता म्हणत ते नेहमीच वलयांकित राहिले. पण मनी लाँड्रिंगच्या आरोपावरून ईडीकडून झालेली चौकशी, दोन वर्षे जेल, शिवाय भ्रष्टाचाराच्या आरोपावरून न्यायालयात सुनावणी चालूच आहे. भुजबळ हे भाजपाच्या रडारावर अनेक वर्षे होते. त्यांचा पुतण्या समीरने बंडखोरी करून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या सुहास कांदे या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात निवडणूक लढवली तेव्हापासून शिवसेनाही भुजबळांवर नाराज आहे. दोन महिन्यांपूर्वीच त्यांचे चिरंजीव पंकज याची विधान परिषदेवर आमदार म्हणून निवड झाली. स्वत: छगन भुजबळांनी येवल्यातून निवडणूक लढवली. समीरने नांदगावमधून लढवली.

भुजबळांची नाराजी व संताप त्यांच्या समर्थकांमध्ये पोहोचल्यावर त्यांचा राग अजितदादांवर निघाला. काही ठिकाणी तर अजितदादांच्या फोटोला जोडो मारा आंदोलन झाले. मंत्रीपद मिळाले नाही म्हणून असे आंदोलन प्रथमच महाराष्ट्रात बघायला मिळाले. अखेर भुजबळांना सांगावे लागले की, पेटवापेटवी करायची नाही, जोडे मारो करायचे नाही, शिविगाळ करायची नाही... लाडक्या बहिणींप्रमाणेच महायुतीच्या मोठ्या यशात ओबीसींचा वाटा मोठा आहे, असे भुजबळ आवर्जून सांगत आहेत. मला मंत्रीपदाची हाव नाही, रास्ता मेरा है, मी रस्त्यावर लढाई लढणार, असे ते म्हणत आहेत. कोणाच्या विरोधात व काय पाहिजे म्हणून ते लढणार आहेत?

समीर भुजबळांचा पराभव करून निवडून आलेले शिवसेनेचे आमदार सुहास कांदे भुजबळांच्या विरोधात बेधडक बोलतात. ते म्हणतात महायुतीत कोणी नाराज नाही. फक्त भुजबळ नाराज आहेत. लोकसभेत त्यांनी गद्दारी केली, विधानसभेत त्यांच्या पुतण्याने गद्दारी केली. दोन्ही निवडणुकांत त्यांनी महायुतीच्या विरोधात काम केले. त्यांना त्यांच्या गद्दारीचे फळ मिळाले आहे...

आपल्याला राज्यसभेवर जायचे होते, तेव्हा सुरुवातीला सुनेत्रा पवार यांना पाठवले, नंतर नितीन पाटील यांना पाठवले, म्हणजे त्यांना शब्द दिलाय, मला मंत्रीपद तर नाहीच आणि म्हणतात राज्यसभेवर जा, अरे भुजबळ म्हणजे काय खेळणं आहे का? असे उदविग्न सवाल ते स्वत: विचारत आहेत. मला मंत्रीपदावरून वगळण्यामागे हेतू काय, असे ते वारंवार विचारत आहेत...

आपल्याला मंत्री करा असे प्रफुल पटेल, देवेंद्र फडणवीस यांनीही सांगितले होते मग का केले नाही, असा प्रश्न त्यांना पडला आहे. पण आता भुजबळ काय करणार? जाणार कुठे? ओबीसींचा एल्गार पुकारण्याची भाषा करतात, मनोज जरांगेंना अंगावर घेतल्याचे बक्षीस मिळाल्याचे सांगतात. आपण कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही, पुढे आणखी संकटे येतील, तुम्ही हिम्मत ठेवा असे ओबीसी समाजाला आवाहन करतात. मला राज्यसभेवर पाठवायचे होते मग विधानसभेला उभे केलेच कशाला, असा प्रश्न ते अजितदादांना विचारतात. कसला वादा, कसला दादा, असे विचारून थेट अजितदादांना खलनायक ते ठरवतात.

तेहतीस वर्षांपूर्वी बारा आमदार बरोबर होते, आज भुजबळांच्या बरोबर कोण आहे? वयाच्या ७७ व्या वर्षी लढण्याची त्यांची ऊर्मी असली तरी ते कोणाविरोधात लढणार? सत्तेला लाथ मारून ते बाहेर जातील का? हम एक है तो सेफ है, अशी घोषणा देऊन ते भाजपाच्या जवळ जाऊ इच्छितात का? ज्या भाजपाने त्यांच्यावर ढिगभर भ्रष्टाचाराचे आरोप केले, तो पक्ष त्यांना जवळ घेईल का? समाजासाठी नव्हे, तर स्वत:ला मंत्रीपद मिळाले नाही म्हणून ते टाहो फोडत आहेत, हे लोकांना कळत नाही असे त्यांना वाटते का?

भुजबळ म्हणतात कब तक सहे एक अपमान हम, सुनते सुनते दिल ही थक जाता है, जब वार हो स्वाभीमान पर हर बार, तो सब का अंत हो
जाता है...
चूप कर क्या मिलता है आखिर, दिल का दर्द ही चढता है,
और फिर उठानी पडती है आवाज, जब पानी सर के उपर चढ जाता है...

## सुट्यांचे नियोजन करताना...


आजमितीला शहरासारख्या ठिकाणी अनेक पालक आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यम आणि कॉन्व्हेंट शाळांत घालत असल्याने या शाळांतील विद्यार्थ्यांना २५ डिसेंबर ते १ जानेवारी अशी मोठी सुट्टी मिळते. वर्षअखेर असल्याने शिल्लक सुट्या संपवायच्या हेतूने नोकरी करणारे पालक सुद्धा या कालावधीत सुट्या घेऊन सहलीचा प्लान करतात. यानिमित्ताने पर्यटन तर होतेच शिवाय नेहमीच्या धकाधकीच्या जीवनाला बाजूला करून वेगळे जीवन जगताना कुटुंबासाठीही वेळ दिला जातो. या मिळालेल्या सुट्टीचा उपयोग अनेकदा पालक केवळ मौजमजेसाठी करताना दिसतात त्यासाठी रिसॉर्ट, वॉटर पार्क किंवा थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचा बेत आखला जातो. ज्यांच्या घरात शाळकरी मुले आहेत अशांनी सुट्यांचे नियोजन करताना पर्यटनासोबत मुलांच्या ज्ञानात कसा भर पडेल आणि या ज्ञानाचा उपयोग त्यांना शिक्षणातही कसा होईल याचाही विचार करायला हवा. आपल्या अद्वितीय पराक्रमाने, इच्छाशक्तीने आणि चातुर्याने इतिहास घडवणारे भारतातील महापराक्रमी राजे-महाराजे इतिहासाच्या पुस्तकातून मुलांना ज्ञात होतात. त्यांच्या पराक्रमांची साक्ष देणारे गड, दुर्ग, किल्ले यांची माहिती मिळते; मात्र ते जवळून अनुभवण्यासाठी, त्यांच्या पराक्रमाच्या आणि बलिदानाच्या खुणा डोळ्यांनी पाहण्यासाठी, त्यांचे अद्वितीय शौर्य प्रत्यक्ष न्याहाळण्यासाठी मुलांना अशा ठिकाणी घेऊन जाण्यासाठी हीच नामी संधी असते. त्यादृष्टीने गड-किल्लेदर्शनाचा समावेश सुट्यांच्या नियोजनात करायला हवा. महाराष्ट्र ही साधू संतांची भूमी आहे. व्यवहार करताना परमार्थ कसा करावा याची शिकवण देऊन जीवनाचा उद्धार करण्याचा मूलमंत्र देणारी कितीतरी संत महंत मंडळी, अवतारी पूरूष महाराष्ट्रात होऊन गेली. त्यांच्या वास्तव्याने आणि सहवासाने पुलकित झालेली अनेक स्थाने महाराष्ट्रात आहेत. एरव्हीच्या धकाधकीच्या जीवनातून काहीकाळ बाजूला काढताना या चैतन्यमय ठिकाणी मुलांना घेऊन जाऊन त्यांच्यासह स्वत:ही तेथील सात्त्विकतेचा लाभ घ्यायला हवा. महाराष्ट्रभूमी जशी साधुसंतांची भूमी आहे तशी अवतारांच्या पदस्पर्शाने पावन झालेली अध्यात्मिक भूमी म्हणूनही महाराष्ट्राची वेगळी ओळख आहे. अष्टविनायक, विविध शक्तिपीठे, ज्योतिर्लिंग या भूमीत वसली आहेत. या प्रत्येक क्षेत्राचा एक वेगळा इतिहास आहे. दूरचित्रवाहिनींवरील मालिका, ग्रंथ आणि इंटरनेट आदींच्या माध्यमातून आपण तो जाणून घेतलेला असतो. हा इतिहास जवळून जाणून घेण्यासाठी आणि तेथील चैतन्य आणि शक्ती अनुभवण्यासाठी अशा ठिकाणी कुटुंबासह जायला हवे. याशिवाय स्वातंत्र्यासाठी प्राणाचे बलिदान करणारे क्रांतिकारक, विचारवंत, समाज सुधारक यांच्या स्मारकांना भेट देऊन त्यांचे कार्य जाणून घेण्यासाठी मिळालेल्या सुट्टीचा उपयोग करता येईल. यंदाच्या ख्रिसमस व्हॅकेशनच्या सुट्ट्यांचे नियोजन करताना पालकांनी या गोष्टीही ध्यानात घेऊया!



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

## आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी व्ही नरसिंहराव

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज पुण्यतिथी. २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

१९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारणातून संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथी दिनी त्यांना विनम्र अभिवादन!

## शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे !!

राष्ट्रीय शेतकरी दिवस हा हिंदीमध्ये किसान दिवस म्हणूनही ओळखला जातो. हा दिवस भारताचे पाचवे पंतप्रधान श्री चौधरी चरणसिंग यांच्या जयंती स्मरणार्थ देखील साजरा केला जातो. शेतकरी दिन हा शेतकरी आणि शेती यांच्या राष्ट्रीय योगदानाचा उत्सव साजरा करण्यासाठी विविध देशांमध्ये वार्षिक साजरा केला जातो. हे जगभरात वेगवेगळ्या तारखांना पाळले जाते. पहिला शेतकरी दिन २००१ मध्ये साजरा करण्यात आला. त्यावेळी दहाव्या सरकारने चौधरी चरणसिंग यांचे कृषी क्षेत्रातील योगदान आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी त्यांची जयंती किसान दिवस म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून भारतातील दरवर्षी २३ डिसेंबर रोजी हा दिवस राष्ट्रीय शेतकरी दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी विविध कार्यक्रम, वादविवाद, परिसंवाद, प्रश्नमंजुषा स्पर्धा, चर्चा, कार्यशाळा, प्रदर्शने, निबंध लेखन स्पर्धा आणि कार्ये आयोजित करून तो साजरा केला जातो.

चरणसिंह यांचा जन्म १९०२ मध्ये उत्तर प्रदेशातील मेरठ जिल्ह्यातील नूरपूर येथे एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात झाला. त्यांनी आग्रा विद्यापीठातून १९२३ मध्ये विज्ञान विषयात पदवी आणि १९२५ मध्ये पदव्युत्तर पदवी मिळवली. कायद्याचे प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांनी गाझियाबादमध्ये कायद्याचा सराव सुरू केला आणि १९२९ मध्ये ते मेरठला गेले. ते पहिल्यांदा १९३७ मध्ये छपरौली येथून यूपी विधानसभेवर निवडून आले आणि १९४६, १९५२, १९६२ आणि १९६७ मध्ये त्यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. १९४६ मध्ये पंडित गोविंद बल्लभ पंत यांच्या सरकारमध्ये ते संसदीय सचिव झाले आणि महसूल, वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य, न्याय, माहिती इत्यादी विविध खात्यांमध्ये त्यांनी काम केले. जून १९५१ मध्ये त्यांची राज्यात कॅबिनेट मंत्री म्हणून निवड करण्यात आली आणि त्यांच्याकडे न्याय आणि माहिती खात्यांचा कार्यभार देण्यात आला. पुढे त्यांनी १९५२ मध्ये डॉ. संपूर्णानंद यांच्या मंत्रिमंडळात महसूल आणि कृषी मंत्रीपद भूषवले. एप्रिल १९५९ मध्ये त्यांनी राजीनामा दिला तेव्हा ते महसूल आणि परिवहन खात्याची जबाबदारी सांभाळत होते. १९६० मध्ये श्री सी.बी. गुप्ता यांच्या मंत्रालयात ते गृह आणि कृषी मंत्री होते. १९६२-६३मध्ये चरणसिंग यांनी श्रीमती सुचेता कृपलानी यांच्या मंत्रालयात कृषी आणि वनमंत्री म्हणून काम केले. त्या दशकात पंजाब आणि हरियाणामध्ये विकसित झालेल्या हरितक्रांतीने देशाचे कृषी चित्र बदलले. यामुळे उत्पादकता वाढली आणि त्यामुळे भारत विविध कृषी मालामध्ये स्वयंपूर्ण झाला. १९६५ मध्ये त्यांनी कृषी विभाग सोडला आणि १९६६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा पदभार स्वीकारला. चौधरी चरणसिंह यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्रीपद भूषवलं होतं. यादरम्यान त्यांनी अनेक महत्त्वाची कामं केली. त्यांच्यामुळेच आज शेतकरी खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला. त्यांनी जमीनदारी रद्द केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी लेखापद पद बनवलं. त्यानंतर ते



प्रविण बागडे, नागपूर
मो.नं. ९९२३६२०९१९
ई-मेल
pravinbagde@gmail.com

उपपंतप्रधान बनले आणि मग २८ जुलै १९७९ ते १४ जानेवारी १९८० पर्यंत त्यांनी अत्यंत अल्प कालावधीसाठी पंतप्रधानपदी विराजमान होऊन पंतप्रधान म्हणून देशाची सेवा केली.

चरणसिंह यांनी उत्तर प्रदेशमध्ये विविध पदांवर काम केले आणि प्रशासनातील अकार्यक्षमता, घराणेशाही आणि भ्रष्टाचार सहन न करणारे कठोर कार्यकारी म्हणून नाव कमावले. एक हुशार संसदपटू आणि व्यावहारिक माणूस चरणसिंग हे त्यांच्या वक्तृत्व आणि विश्वासासाठी ओळखले जातात. ते उत्तर प्रदेशातील जमीन सुधारणांचे मुख्य शिल्पकार होते; ग्रामीण कर्जदारांना मोठा दिलासा देणारे विभाग विमोचन विधेयक १९३९ तयार करण्यात आणि अंतिम करण्यात त्यांनी प्रमुख भूमिका बजावली. मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी जमीनधारणा कायदा १९६० आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याचा उद्देश जमीनधारणेची कमाल मर्यादा कमी करणे आणि राज्यभर एकसमान करणे हे होते. एक समर्पित सार्वजनिक कार्यकर्ते आणि सामाजिक न्यायावर दृढ विश्वास ठेवणारे चरणसिंग यांचे सामर्थ्य मुळात लाखो शेतकऱ्यांच्या विश्वासातून निर्माण झाले. भारत हा मुख्यत: खेड्यांचा देश आहे आणि खेड्यांमध्ये राहणारी बहुसंख्य लोकसंख्या शेतकरी आहे आणि शेती हा त्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. अजूनही ७०% भारतीय लोकसंख्या शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून आहे.

चौधरी चरणसिंह यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध धोरणांनी भारतातील सर्व शेतकऱ्यांना जमीनदार आणि धनदांडग्यांच्या विरोधात एकत्र केले. भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेल्या जय जवान जय किसान या प्रसिद्ध घोषणेचे त्यांनी पालन केले. ते एक अतिशय यशस्वी लेखक होते आणि त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली ज्यात शेतकरी आणि त्यांच्या समस्यांबद्दल त्यांचे विचार मांडले गेले. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी विविध उपायांच्या स्वरूपात खूप प्रयत्न केले. त्यांनी साधे जीवन व्यतीत केले आणि आपला मोकळा वेळ वाचन आणि लेखनात घालवला. त्यांनी जमीनदारीचे निर्मूलन, सहकारी शेतीचा क्ष-किरणभारताची गरिबी आणि त्याचे निराकरण, शेतकऱ्यांची मालकी किंवा मजुरांसाठी जमीन आणि खालील जमीन ताब्यात घेणे यासह एक निश्चित किमान खाली विभाजनास प्रतिबंध' असे अनेक पुस्तके लिहिल्या. शेतकरी हा भारताचा कणा आहे. चौधरी चरणसिंग अत्यंत साध्या मनाचे व अत्यंत साधे जीवन जगणारे शेतकरी नेते होते, ज्यांनी भारतीय शेतकऱ्यांचे जीवन सुधारण्यासाठी अनेक धोरणे आणली. ते शेतकरी कुटुंबातील होते आणि त्यामुळे भारताचे पंतप्रधान असूनही त्यांनी अतिशय साधे जीवन जगले. आपल्या जीवनातील शेतकऱ्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि त्याची कबुली देण्यासाठी राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा केला जातो. सर्वांना शेतकरी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

## देहदान सर्वश्रेष्ठदान.. !!

बऱ्याच वर्षां नंतर मेडिकल कॉलेज पाहाण्या करिता गेलो होतो. सर्व विभाग पाहिल्यावर एका दालनात प्रवेश केला. तो शरीर-विच्छेदन विभाग होता. विस्तीर्ण अशा त्या दालनात बरेच टेबल ठेवले होते. त्यातील काही टेबलांवर मानवी शरीरे मृता वस्थेत पडली होती. दालनात औषधी द्रव्यांचा उग्र वास येत होता. मन थोडे चरकले, पण हिमत करून मी त्या शरीरांना जवळून निरखले. अनेक रोगांनी पीडित अशी ती मृत मानवी शरीरं पाहून मन व्यथित झाले. मी डॉक्टरांना विचारले, विद्यार्थी अशा रोग जर्जर शरीरांचे विच्छेदन करून त्यांच्यावर अभ्यास करतात. चांगली सुदृढ शरीर का नाही अभ्यासासाठी वापरीत? तेव्हा ते म्हणाले की, चांगल्या सुखसंपन्न घराण्यांतून महाविद्यालयाला शरीर दान कोणी करीत नाही. दान केलेच तर ते प्रमाण फारच अल्प आहे. तेव्हा आम्हाला अशी अनेक व्याधींनी ग्रस्त, रस्त्यावर अथवा रुग्णालयात मृत झालेली, बेवारस घोषित करण्यात आलेली शरीरच अध्ययन करण्याकरिता वापरावी लागतात. त्याला आमचा नाइलाज आहे. हे सर्व पाहून मी माझे व माझ्या पत्नीचे दोघांचे इच्छापत्र मेडिकल कॉलेज अकोला येथे सादर केले आहे. आपल्या मृत्यूनंतर आपले शरीर जाळण्या पेक्षा ते शरीर जर कामात येत असेल त्यामधून पुढील चांगले डॉक्टर घडू शकत असतील व त्या माध्यमातून मानवी शरीराचा अभ्यास करून नवीन काही संशोधन होऊन मानवाच्या हाती काही चांगल्या गोष्टी लागत असतील तर ते संपूर्ण विश्वासाठी फायद्याचे ठरणार आहे. म्हणून मग मी व माझ्या पत्नी आम्ही दोघांनी त्याच क्षणी मी निर्णय घेतला की, मी माझे शरीर मृत्युनंतर मेडिकल कॉलेजच्या शरीरशास्त्र विभागाला दान करीन अथवा माझा मृत्यू ज्या गावी होईल तेथून जवळ असलेल्या मेडिकल कॉलेजला ते दान करीन तशा पद्धतीची शासकीय प्रक्रिया अकोला मेडिकल कॉलेजला मी व माझ्या पत्नीने करून घेतली आहे.

**मृतदेहाचे दान करा!**

वेळोवेळी वृत्तपत्रांमधून भिन्नभिन्न वैद्यकीय महाविद्यालयांद्वारे, विद्यार्थ्यांच्या शरीरशास्त्र अभ्यासारिता, मानवी मृत देह दान करण्याचे आवाहन करण्यात येते, परंतु या विनंतीस समाजाकडून योग्य तो प्रतिमाद पाहिजे त्या प्रमाणात मिळत नाही. असे म्हटले जाते, परंतु या डॉक्टरी व्यवसायाला सध्या व्यापारी स्वरूप आले आहे. हे अमान्य करून चालणार नाही. डॉक्टरांच्या 'कन्सल्टिंग'चा तदनंतरच्या विविध तपासणींचा व औषधोपचारांचा खर्चच इतका असतो की, रुग्ण सर्व दिव्यातून जाताना अर्धा-अधिक्खतम होतो. जो काही उरतो, त्यात तो पूर्णत: बरा होऊन समाजात वावरेल याची शासवती एकही डॉक्टर देत नाही असो. नेत्रदान करण्यात यावे, ही देखील इच्छा व्यक्त करण्यात आली आहे. भविष्यात मूत्रपिंड () दानाची व्यवस्था आली, तर तेही दान करण्याची शासकीय मेडिकल कॉलेजच्या तत्कालीन इच्छा मी व्यक्त करीन. माझे ते इच्छापत्र, संबंधित विभागाकडे आम्ही उभयतांनी जाऊन सुपूर्द केले. तदनंतर त्या विशिष्ट विभागाकडून मला, माझ्या इच्छापत्राची पोच सन्मानपत्र व मृत शरीरदानासंबंधी छापील नियमावली मिळाली. ती पुढील प्रमाणे ते नियम खाली देत आहे. त्यातील नियम सर्वांच्या माहितीसाठी अशाच व्यक्तीचेच शरीर स्वीकारले जाते. जी व्यक्ती फक्त नैसर्गिक रीतीने मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे शरीर स्वीकारला जाते. जसे खून, आत्महत्या अथवा अपघात यांनी मृत्यू पावलेल्यांचे शरीर स्वीकारले जात नाही. वारसाहक्क प्राप्त झालेल्या व्यक्तींनी नैसर्गिक मृत्यू आलेल्या व्यक्तीचा मेडिकल कॉलेजच्या शवविच्छेदन विभागाला द्यावयाच्या विनंति पत्रासोबत पोलिस विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.

शरीरदान करणाऱ्या व्यक्तीने केलेल्या इच्छापत्राची प्रत मेडिकल कॉलेजला द्यावयाच्या माहिती पत्रा सोबत जोडणे आवश्यक आहे. मृत व्यक्तीच्या अतिजवळच्या अथवा वारसा हक्काने त्याच्या मिळकतीवर हक्क असणाऱ्या दोन व्यक्तींचे ना-हरकत्रत्र मेडिकल कॉलेजला पाठवण्यात येणाऱ्या विनंती पत्रास जोडण आवश्यक आहे. मृत व्यक्तीचा वारसा हक्क प्राप्त झालेल्या व्यक्तीने मेडिकल कॉलेजला मृत शरीर स्वीकारण्याची विनंती करावी.

दान केलेले मृत शरीर शक्य तितक्या लवकर मेडिकल कॉलेजच्या शरीर शास्त्र विभागाकडे रवाना करण्यात यावे जेणे करून त्याचा शवविच्छेदन विभागान्ना काही उपयोग होऊ शकेल. मृत्यू झाल्याच्या जागे पासून मेडिकल कॉलेजच्या शवविच्छेदन विभागापर्यंत शव पोचविण्याची जबाबदारी दान्याच्या निकट-च्या आप्तेष्टांची वारसाची राहील.

उपरोक्त नियम मान्य असल्यासंबंधीच्या पत्राच्या प्रती व इतर आवश्यक पत्रव्यवहार, प्राध्यापक, शरीरशास्त्र विभाग, शासकीय मेडिकल कॉलेज यांच्याशी प्राचार्याच्या मार्फत करावा. बराच खटाटोप, मोठेच दीव्य या सर्व नियमा वर दृष्टिक्षेप टाकल्यावर मृत शरीराचे दान करणे बरेच कष्टाचे वाटतात आहे. मृत व्यक्तीच्या नातेवाईकाना वारसा हक्क प्राप्त असलेला व्यक्ती समोरासमोर उभा करावा लागतो. बऱ्याच कायदेशीर दिव्यातून जावे लागते हे लक्षात येत. तेव्हा माझी शासनाला नम्र नम्र एवढीच विनंती आहे की मृत शरीर दान करण्याची भावना जर समाजात रुजवायची व लोकप्रिय करावयाची असेल तर संबंधित नियमात शिथिलता आणावी हे दान देखील इतर दानांप्रमाणेच सुलभ व लोकप्रिय करण्याकरता शासनाने काही नियम शितील किंवा बदल करावे. मानवी शरीरांची मेडिकलच्या विद्यार्थ्यांना अध्ययनाकरिता नितांत आवश्यकता आहे, ही बाब शासनाने विसरू नये.

**अभ्यास झाल्यावर दहन करा!**

स्थानिक शासकीय मेडिकल कॉलेजच्या संबंधित विभागाने फक्त एवढी काळजी घ्यावी की शव विच्छेदन करून अभ्यास झाल्यावर त्या शरीराचे अथवा त्या शरीरांच्या विविध अंगांचे दहन अथवा दफन करावे. त्या मागे मृत व्यक्तीच्या निकटच्या लोकांच्या भावना असतात. त्यांना तडा जाता कामा नये.

बरेच वेळा मी विविध व्यक्तींशी चर्चा केले की, त्यात सर्वच दानांचा समावेश होतो. चर्चेत असे आढळून आले की, मृत शरीर दान बाबत अनेक गैरसमज आहे. नेत्रदान हे मृत्यूनंतर ६ तासाच्या आत करावयाचे असते. मूत्रपिंड (किडनी) दान हे ताबडतोब करावयाचे असते. म्हणजे त्यासाठी दांत्याचा मृत्यु संर्वोधन झाल्यावर मृत शरीर लवकरात लवकर रुग्णालयात जाने किंवा त्याच ठिकाणी मृत्यू होणे आवश्यक आहे. अशा प्रकारे संबंधित विभागाला कडून शरीर अभ्यासाच्या दृष्टीने प्रत्येक व्यक्तीने आपल्या घरी मृत्यू झालेल्या व्यक्तीचे देहदान करावे.

**श्रीलंकेत फार महत्त्व..!**

येथे उल्लेखित सर्व दान दात्याने मृत्यूपर्वी इच्छापत्र करून, जवळच्या आप्तेष्टांना, वारसांना व फौमेली डॉक्टरांना त्यासंबंधी कल्पना देऊन करावयाची असतात. कारण दात्याच्या मृत्युच्या पश्चात 'ते' सवं व्यवहार संबंधित वारसा हक्क प्राप्त नातेवाईकांनी व डॉक्टरांनी पार पाडावयाचे असतात. काही गैरसमज व जूनाट विचार प्रचलित असतात रूढी परंपरेला तिलांजली देणे काळाची गरज आहे. सर्व सामान्य समाजात ह्या संबंधी ज्या काही अंधश्रद्धा आहेत. त्यांच्याकडे नव्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहाण्याची नितांत आवश्यकता आहे.

त्यामुळे श्रीलंके सोबत इतर प्रगट राष्ट्रांमध्ये नेत्रदान व शरीरदान करण्याचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. भारतात फक्त नेत्रदानाचाच विचार केला तर आज अंदाजे ५० लाख अंधाना नेत्रदानाची आवश्यकता आहे. परंतु, आपण बहुमोल असे नेत्र रोज शेकडोंच्या प्रमाणात तचा, मेंदू शरीर कोणत्याही मागचा पुढचा विचार न करता कारण नसताना जाळून टाकतो. मानवी रक्त, डोळे अवयव कार्यशाळेत निर्माण करता येत नाहीत. ही मग ही इश्वराची, निसर्गाची निर्मिती आहे. हा आपल्या हक्काचा बहुमोल ठेवा मातीमोल करू नका. या संबंधित मोठ्या प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक आहे. तसेच शिकल्या सवरल्या लोकांनी या जन अभियानात पुढे येऊन स्वत:हून सहभाग घेणे खूप आवश्यक आहे. तरच खऱ्या अर्थाने अवयदान अभियानाला महत्व येईल. हे अभियान यशस्वी होवू शकते. मी अवयव दान केले आपण सुद्धा अवय दान करून राष्ट्रीय कार्यास हातभार लावा ही जागरूक नागरिकांना मना पासून नम्र विनंती.

समाजसेवक गजानन हरणे
समाजसेवक तथा संयोजक निर्भय बनो जन आंदोलन.
जिल्हा परिषद नगर खडकी अकोला.
संपर्क ९८२२९४२६२३.

**अशोकायन...**

## नॉट रिचेबल

घरकर्त्या माणसाला
जेंव्हा येते टेन्शन
तेंव्हा तो सर्वांशीच
तोडतो कनेक्शन ...

कुणाला टाळायचं असेल
तरी ते होती नॉट रिचेबल
कारण सामना करण्यास
ते नसतात भाऊ एबल ...

मनाजोगतं होत नसेल
तरी वापरतात हा फंडा
समोरचा नरम होऊन
म्हणतो जाऊ दया गड्या ...



प्रा.अशोक सारडा मेहकर
(९४२२३९४३३९)

# किसान दिवस – देशाला जेवू घालणाऱ्या या खऱ्या हिरोजना मानवंदना देत कलाकार भाष्य करत आहेत

भारतामध्ये दरवर्षी २३ डिसेंबर हा दिवस अतिशय कृतज्ञतेने किसान दिवस किंवा राष्ट्रीय शेतकरी दिन म्हणून साजरा केला जातो. एक दूरदर्शी नेता आणि माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंग यांच्या जयंतीनिमित्त हा महत्त्वपूर्ण दिवस पाळला जातो त्यांनी शेतकऱ्यांचे हक्क आणि कल्याण यासंदर्भात प्रचंड काम केले. भारताची अर्थव्यवस्था आणि समाजाला आकार देण्यासाठी जी महत्त्वपूर्ण भूमिका शेतकरी बजावतात त्याची मनापासून दखल घेण्याचा हा दिवस आहे. शेतकऱ्यांसमोरील आव्हाने आणि त्यांच्या कल्याणामध्ये समर्थन देण्याची एकत्रित जबाबदारी या गोष्टींकडेही लक्ष वेधले जाते. या दिनाच्या सन्मानार्थ झी टीव्हीवरील कलाकार जाने अनजाने हम मिलेमधील आयुषी खुराणा, जमाई नं. १ मधील सिमरन कौर, जागृती – एक नयी सुबहमधील आर्य बब्बर, बस इतना सा ख्वाबमधील योगेंद्र विक्रम सिंग, वसुधामधील अभिषेक शर्मा आणि कैसे मुझे तुम मिल गयेमधील प्रतीक्षा होनमुखे यांनी शेतकऱ्यांचे आभार मानले आणि आपल्या देशातील तेच खरे अनसंग हिरोज असल्याची भावना व्यक्त केली.

झी टीव्हीवरील जाने अनजाने हम मिले मध्ये रीतच्या भूमिकेतील आयुषी खुराणा म्हणाली, मी माझ्या आजी आजोबांकडून त्यांच्या शेतातील काम करण्याच्या गोष्टी ऐकतच लहानाची मोठी झाले आणि त्यांचे हे समर्पण मी स्वतः माझ्या डोळ्यांनी पाहिलेही आहे, त्यामुळे किसान दिवसाचे माझ्या मनात अतिशय खास स्थान आहे. शेतकरी आपल्या देशाचा खरा कणा आहेत. आपल्या ताटात अन्न यावे यासाठी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत ते अथक मेहनत करतात. खराब हवामानाला सामोरे जातात. त्यांच्यासमोर अनेक आर्थिक अडचणी आणि अनिश्चितता असतात. पण तरीही त्यांचा चिवटपणा आणि अथक मेहनत ही मला दररोज प्रेरणा देते. हा दिवस केवळ साजरा करण्यासाठी नसून ही आपल्या सर्वांसाठी एक आठवण आहे की आपण त्यांचे अमूल्य योगदान समजून घ्यावे आणि त्यांच्या कल्याणासाठी प्रयत्न करावेत. त्यांच्या मेहनतीला सन्मान देण्यासाठी, त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि जिथे प्रत्येक शेतकऱ्याला आपले काही मूल्य आहे आणि आपण सशक्त आहोत अशी भावना निर्माण होईल अशा भविष्याच्या दिशेने आपण काम करायला हवी. शेवटी त्यांची ताकद आपल्या आयुष्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

झी टीव्हीवरील जमाई नं. १ मधील रिद्धीच्या भूमिकेतील सिमरन कौर म्हणाली, मी शहरातच लहानाची मोठी झाले त्यामुळे आपण जे अन्न खातो त्याच्या निर्मितीमध्ये किती प्रचंड मेहनत असते हे मला नीटसे कधी कळूनच आले नाही. पण आता जशी जशी मी वाचायला लागले, नवीन शिकायला लागले तसतसे मला कळून चुकले की शेती करणे हे काही सोपे काम नाही. शेतकऱ्यांच्या आयुष्यानीच मला त्यांच्या अथक समर्पण आणि प्रचंड शक्ती या गोष्टींबद्दल प्रशंसा करायला शिकवले. या अनसंग हिरोजच्या मेहनतीचा सन्मान करण्यासाठी किसान दिवस एक शक्तिशाली रिमाइंडर आहे, जे सर्व ऋतूंमध्ये आपल्या ताटात अन्न यावे यासाठी काम करत असतात. शेती हा केवळ व्यवसाय नाही तर ती एक जीवनरेखा आहे. प्रत्येक अन्नाच्या दाण्यामागे आशा, कठोर मेहनत आणि चिवटपणा यांची गोष्ट लपलेली असते. चला तर एकत्र येऊया आणि आपल्या शेतक ऱ्यांच्या कल्याणासाठी काम करूया. त्यांचे मूल्य वाढवूया, त्यांचे सशक्तीकरण करू या आणि त्यांच्या योगदानासाठी त्यांना योग्य मोबदला मिळेल या दिशेने काम करूया.

झी टीव्हीवरील जागृती – एक नयी सुबह मध्ये कलिकांत ठाकूरच्या भूमिकेतील आर्य बब्बर म्हणाला, आपल्या देशाच्या भविष्याला आकार देण्यामध्ये शेतकऱ्यांचे महत्त्व सर्वाधिक असून कठीण परिस्थितीमध्येही अखंड मेहनत करून ते आपल्याला पोषण प्रदान करतात. त्यांचे कठोर परिश्रम, निर्धार आणि चिवटपणा या आधारस्तंभांवर आपली शेती आणि अर्थव्यवस्था उभी आहे. लाखों लोकांना जेवू घालण्यासाठी ते दररोज करत असलेल्या त्यागाला ओळखण्यासाठी किसान दिवस एक रिमाइंडर आहे. आपण हा दिवस साजरा करत असताना त्यांना समर्थन देण्यासाठी, त्यांचे संघर्ष जाणून घेण्यासाठी आणि भारतातील शेतीच्या अधिक चांगल्या आणि स्थायी भविष्यासाठी काम करण्यासाठी शपथ घेऊया. त्यांच्या परिश्रमाचे दररोज मूल्य होईल, त्यांना आदर मिळेल आणि कौतुक होईल असे वातावरण निर्माण करू या.

झी टीव्हीवरील बस इतना सा ख्वाब मधील शिखरच्या भूमिकेतील योगेंद्र विक्रम सिंग म्हणाला, शेतकरी आपल्या देशातील अनसंग हिरोज आहेत आणि खरोखरच ते आपल्या देशाचा कणा आहेत. किसान दिवस साजरा करणे हे आपल्या सर्वांसाठी अतिशय महत्त्वाचे असून यातून माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंग यांच्या भारताच्या कृषिविषयक सुधारणांमधील अमूल्य योगदानाचा सन्मान होतो. आपण खात असलेल्या अन्नाचा प्रत्येक दाणा हा शेतकऱ्यांच्या अथक मेहनत आणि समर्पणाचा परिणाम आहे. त्यांच्या परिश्रमांप्रति आपण नेहमीच कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. या खास दिवशी मी सर्वांना आग्रह करतो की शेतकऱ्यांप्रति दयाळूपणा आणि कौतुक दाखवावे कारण ते आपल्या आयुष्यात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात.


झी टीव्हीवरील वसुधामध्ये देवांशच्या भूमिकेतील अभिषेक शर्मा म्हणाला, आपल्या देशाचा कणा असलेल्या शेतकऱ्यांच्या त्याग आणि अथक मेहनतीवर किसान दिवस प्रकाश टाकतो. विरूद्ध परिस्थितीतही आपल्या जमिनीवर शेती करण्याच्या दृष्टीने त्यांचे अढळ समर्पण हे अतिशय प्रेरणादायी आहे. माझ्या मते एक समाज म्हणून आपण त्यांना ते पात्र असलेला आदर, समर्थन आणि स्त्रोत प्रदान केले पाहिजेत. या खास दिवशी आपल्या शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहण्यासाठी, त्यांच्या आयुष्याचे कल्याण करण्यासाठी आणि त्यांचे योगदान केवळ आजच नव्हे तर दररोज साजरे व्हावे यादृष्टीने काम करण्याची प्रतिज्ञा घेऊया. आपल्या देशामध्ये अन्नाची सुरक्षितता पाळण्यासाठी काम करणारे ते अनसंग हिरोज आहेत.

झी टीव्हीवरील कैसे मुझे तुम मिल गए मधील प्रियांकाच्या भूमिकेतील प्रतीक्षा होनमुखे म्हणाली, लहानाची मोठी होत असताना अन्नाचा एक दाणा निर्माण करण्यासाठी किती मोठ्या समर्पणाची गरज लागते हे माझ्या कधीच लक्षात आले नाही. पण आज मला त्यांचे प्रयत्न अधिक चांगल्या पद्धतीने समजले आहेत. ते आपल्याला जेवू घालण्यासाठी दिवस रात्र मेहनत घेतात आणि म्हणून मला त्यांच्याबद्दल अतिशय आदर आणि कृतज्ञता वाटते. आपले आयुष्य आणि आपल्या देशाचा विकास घडवण्यामध्ये शेतकरी जी महत्त्वाची



भूमिका बजावत आहेत त्याची किसान दिवस आठवण करून देतो. त्यांच्यासाठी केवळ आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच नव्हे तर त्यांचे संघर्ष जाणून घेण्यासाठी आणि त्यांचे आयुष्य चांगले बनेल यासाठी असलेल्या समर्थन उपक्रमांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठीही काम करूया. ज्या अन्नाचा आम्ही आनंद घेतो त्यामागील शांतपणे काम करत असलेली शक्ती बनण्याबद्दल मी प्रत्येक शेतकऱ्याचे आभार मानते.

## शांत राहून सक्रीय रहा : संत राजिन्दर सिंह जी महाराज



बालपणापासून आपण आपल्या जीवनात काही ना काही कार्य करत असताना प्रत्येक वेळी त्यात व्यस्त राहतो. आई-वडील आपल्या मुलासाठी एक यादी बनवतात. आपले बालपणाचे जीवन एक मागे एक कार्य करण्यात जात असते. आपण शाळेत वेळेवर वर्गात पोहोचण्यासाठी धावपळ करतो. जेव्हा आपण पदवीधर होतो, तेव्हा आपण नोकरी किंवा इतर कोणतेही कामकाज करण्यासाठी धावपळ करतो. आपल्याला भरपूर प्रकारची कामे असतात त्यांना पूर्ण करण्यासाठी आपले सर्व जीवन व्यस्त राहते. यासाठी जेव्हा पण आपण ध्यान-अभ्यास करण्यासाठी बसण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा आपण शांत बसणे आणि आपल्या मनाला शांत करणे महाकठीण असते.

साधारणपणे आपण आपल्या काम-काजाला अधिक महत्त्व देतो. जेवढे जास्त काम करतो तेवढं जास्त चांगलं वाटते. खूपच कमी माणसे शांत होऊन मौन अवस्थेत बसण्याला महत्त्व देतात. आपण विचार करतो की जर आपण शांत बसलो तर आपण काही करत नसतो. आपण घाबरतो की आपल्याला आळशी किंवा अकार्यक्षम म्हटले जाईल. वास्तविक प्रत्येक व्यक्ती आपल्या सर्व व्यस्त कार्यकाळातून वेळ काढून शांत होऊन मौन अवस्थेत बसले पाहिजे. शांत राहण्यात जीवनात भरपूर फायदे आहे. शांतते मध्ये आपल्याला रचनात्माक विचार येतात. शांत राहून आपण अडचणीतून मार्ग काढतो त्यामुळे आपले संबंध चांगले होतात. शांततेमुळे शास्त्रज्ञ, संगीतकार, कलाकार, कवी, लेखक, तत्त्वज्ञानी आणि संशोधक एक उत्तम रचना निर्माण करून प्रसिद्ध होतात. शांततेमुळे नवीन नवीन विचार येतात, जे विश्वात अद्भुत बदल आणतात.

अशा प्रकारे शांत होऊन आपण आपल्या आत्म्याला ओळखू शकतो आणि पिता-परमेश्वरला प्राप्त करू शकतो. आपण बाहेरच्या कामकाजामुळे परमात्म्याला प्राप्त करू शकत नाही. परमात्म्याला केवळ अंतरी प्राप्त करू शकतो. अध्यात्मिक दृष्ट्या विकसित होण्यासाठी ध्यान व ध्यानासाठी शांतता खूप आवश्यक आहे. आपले जीवन व्यस्त रुळावरून पळणाऱ्या रेल्वे प्रमाणे आहे. आपण व्यस्त राहण्यास इतके अधीन झालो आहोत की आपल्याला काम-काजाला थांबून शांत बसणे अवघड वाटते. जसे कोणत्याही समस्याचा उपाय शोधण्यासाठी किंवा काही नवीन बनविण्यासाठी आपले व्यस्त जीवनातून वेळ काढून आपण त्यावर लक्ष देतो. ठीक याप्रकारे स्वतःला ओळखणे आणि परमात्म्याला प्राप्त करण्यासाठी आपल्याला शांत बसणे आवश्यक आहे.

जेव्हा आपण शांत होऊन बसतो तेव्हा कदाचित दुसऱ्याच्या नजरेतून आपण काही करत नसतो. परंतु अशा अवस्थेत आपण स्थिर व शांत होऊन स्वतःला ओळखणे व परमात्म्याला प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. केवळ काहीच लोक परमात्म्याला प्राप्त करतात, कारण तेच लोक आपले ध्यान बाहेरून हटवून अंतर्मुख करतात. जर आपण शांत होऊन काही नाही न करता बसणे शिकलो तर आपण सर्व काही प्राप्त करू शकू. हे चांगले होईल की आपल्यातील प्रत्येक व्यक्ती रोज वेळ काढून शांत होऊन बसण्याचा अभ्यासाचा सराव करावा.

जर आपण काही वेळ शांत बसलो तर याचे आपल्याला अनेक फायदे मिळतात. आपण आपल्या कामातून काही वेळ शांत होऊन हा विचार करायला पाहिजे की का आपण आपले काम चांगल्या तऱ्हेने करतो का? आणि जर नाही तर यापेक्षा उत्तम कशा प्रकारे करावे? ज्यामुळे आपण काम करण्याचे नवीन आणि चांगले प्रकार जाणू शकतो. जर आपण घर चालवितो तर काही वेळ शांत राहून हे जाणू शकतो की आपण आपल्या परिवाराच्या समस्या कशा सोडवाव्या किंवा आपल्या परिवाराची जीवन कसे चांगल्या प्रकारे बनवू शकतो? जर आपण कला क्षेत्राशी जोडलेले आहोत तर आपण शांत अवस्थेत बसून आपली रचनात्मकतावर लक्ष देऊ शकतो.

जर आपण आपल्या जगातील कामात शांततेने बसण्याची कला शिकलो तर हे आपल्याला ध्यान-अभ्यासामध्ये फायदेशीर राहील. आपण स्वतःचा अनुभव कराल की आपल्या मध्ये अस्वस्थता आणि पळापळ कमीत कमी होते. तेव्हा आपण जास्त वेळेपर्यंत स्थिर राहण्याची क्षमता वाढवू शकतो. आपण आपल्या मनाला शांत करून आपल्या आत्म्याचा आवाज ऐकू शकू. जेव्हा आपण शांत असतो तेव्हा आपण पाहतो की आपला आत्मा परमात्म्याला प्राप्त करण्याचा धावा करतो. जर आपण शांत राहिलो तर तेव्हा आपण परमात्म्याचा आवाज म्हणजे प्रभूच्या शब्दाला ऐकू शकू.

आपण शांत राहून वेळे बरोबर आपण सर्व कामकाजामध्ये संतुलन आणू शकतो. ज्याचे फायदे आपण आपल्या ध्यान-अभ्यासाच्या प्रगतीमध्ये होतात. असे केल्याने आपण मिळवितो की आपण प्रभूच्या प्रेमाचा अनुभव आपल्या अंतरी करू करतो आणि परमात्म्याच्या प्राप्तीच्या मार्गावर जलद प्रगती करू शकतो.

## क्रोमाने केले सुपरर एक्स्चेंजचे अनावरण : तिप्पट फायद्यासाठी तुमच्या जुन्या इलेक्ट्रॉनिक्सचा फायदा करून घ्या




**मुंबई, २१ डिसेंबर :** टाटा समूहाचा पाठिंबा असलेल्या भारतातील सर्वात मोठ्या इलेक्ट्रॉनिक्स किरकोळ विक्रेता, क्रोमाने नवीन वर्षाच्या उत्सवाची सुरुवात करण्यासाठी त्यांच्या Superrr Exchange चे अनावरण केले! सुपरर एक्स्चेंज ग्राहकांना त्यांचे जुने इलेक्ट्रॉनिक्स अपग्रेड करणे सोपे करते, यासोबतच स्वच्छ, हरित भविष्यासाठी ते योगदान देते. ग्राहकांना नवीन, ऊर्जा-कार्यक्षम उपकरणांसाठी त्यांच्या कालबाह्य गॅझेटची देवाण-घेवाण करण्यासाठी Superrr Exchange २१ डिसेंबर, २०२४ पासून तिप्पट नियमित लाभ देते.

Superrr एक्स्चेंजअंतर्गत निवडक घरगुती उपकरणे आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या विस्तृत श्रेणीची देवाण-घेवाण करणाऱ्या ग्राहकांना ३ एक्स्चेंज फायदे व अगदी नवीन उत्पादनांवर विशेष बक्षिसे आणि सूट मिळतील. याशिवाय, जुने लॅपटॉप आणि मोबाइलची देवाण-घेवाण करताना २१,००० रुपयांपर्यंतची बचत शक्य आहे.


या सार्वत्रिक विनिमय उपक्रमाचा एक भाग म्हणून ग्राहक कोणतेही जुने उपकरण घेऊन जाऊ शकतात आणि कोणत्याही नवीन उत्पादनासह बाहेर पडू शकतात. होय, याचा अर्थ असा की, तुम्ही तुमचे न वापरलेले जुने ग्राइंडर बदलून नवीन स्मार्ट टीव्ही घेऊन बाहेर पडू शकता. इतकेच काय, यापुढे जी उपकरणे बंद पडली आहेत, त्यासाठीही ग्राहकांना चिंता करण्याची गरज नाही. अगदी ५०० रुपयांच्या क्रोमा व्हाउचरच्या बदल्यात ते त्यांच्या जवळच्या क्रोमा स्टोअरमध्ये ती देऊन येऊ शकतात.

Superrr एक्स्चेंज देशभरातील सर्व ५५०+ क्रोमा स्टोअर्समध्ये लागू असेल. यामुळे देशाच्या प्रत्येक भागातील ग्राहकांना त्यांच्या जुन्या उपकरणांचा जबाबदारीने व्यवहार करणे पूर्वीपेक्षा सोपे होईल. प्रत्येक क्रोमा स्टोअरमध्ये एक डिस्पोजल क्षेत्र आहे, जेथे या उत्पादनांचे रीसायकल भागीदारांच्या साहाय्याने नैतिकरीत्या पुनर्नविनीकरण करण्यासाठी जुने इलेक्ट्रॉनिक्स गोळा केले जातात.

शिबाशिष रॉय, मुख्य कार्यकारी अधिकारी, Infiniti Retail Ltd. म्हणाले, नवीन वर्षाचे स्वागत करत असताना, Superrr Exchange नवीन सुरुवात करण्यास मदत करत आहे. जेव्हा लोक देवाण-घेवाणीचा लाभ घेतात, तेव्हा त्यांना केवळ नवीन उपकरणच मिळत नाहीत, तर ते जबाबदारीने खरेदी करण्याचा जाणीवपूर्वक विचार करू लागतात. राहण्यासाठी पृथ्वीला एक चांगले ठिकाण बनविण्यासाठी थोडेसे बदल आवश्यक आहेत, अशी ज्या लोकांची मान्यता आहे, त्या लोकांच्या वाढत्या चळवळीत आम्ही सहभागी होत आहोत.

इनस्टोअर प्रमोशन व्यतिरिक्त, क्रोमा सोशल मीडिया, जाहिराती आणि इतर लक्ष्यित आउटरीच मोहिमांद्वारे याची माहिती देईल. अपग्रेड आणि रीसायकल करणे अधिक फायद्याचे बनवून, सुपरर एक्स्चेंज आपल्या ग्राहकांप्रति, तसेच या ग्रहासाठी क्रोमाच्या वचनबद्धतेची पुष्टी करते आणि हे सिद्ध करते की, अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक्समध्ये अपग्रेड करणे व पर्यावरणाची काळजी घेणे हे एकमेकांसोबत जाऊ शकते. सर्व जुन्या इलेक्ट्रॉनिक्सवर पर्यावरणाच्या दृष्टीने जबाबदार पद्धतीने प्रक्रिया आणि पुनर्वापर केले जाईल.

## शब्दकोडे क्रमांक १९९८



**आडवे शब्द :-**


१) निमग्न, गुंग
३) उदा हिंदू, मुस्लीम ख्रिश्चन इ
४) पावसाची धार
६) आर्जव
९) गर्दभ
१०) दाखला
१२) संरक्षक जाड भिंत
१४) घर
१५) शरीरातील वात दूर करणारा
१६) नव्वद अंशाच्या आतील कोन
१७) वेळ वाया घालविणे
१९) दु:खाची छाया
२१) ज्या प्रमाणे
२२) आश्रय, थारा
२४) बेतास बेत
२७) दात
२८) पंख
२९) त्याला (सं)
३०) एका बाजूस झुकणे
३२) नात्यातील मनुष्य
३३) जकात
३६) धनी
३७) लष्करी छावणीतील बाजार
३९) महिना
४०) दरवाजा
४२) डावरा
४४) पंख
४५) एक चतुर्थांश भाग
४६) अपशकुन (करणे)
४८) कातडी
४९) वडिलांचे वडील
५०) साहसी कृत्य, मूर्खपणाचे काम करणारा
५१) पशू
५२) कायदा मोडणे
५५) झकास
५६) पुन्हा
५७) तीन पानांचा एक म्हणीतील वृक्ष
५९) अंबाडीसारखे एक झाड, त्याचा वाख
६०) जावयाला पहिल्या दिवाळीत मिळणारी भेटवस्तू
६१) गावातील नागरिक, गावात राहाणारे
६२) वात्रट
६३) आवाज होणे
६४) काम करण्याची पात्रता
६६) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
६७) खर्चात कपात, कतरबेत,
६८) पुष्पदल

**उभे शब्द :-**

१) पहारेकरी
२) होडी
३) श्रीमंत
४) सारखा
५) वाळवंट
६) दोस्त, सूर्याचे एक नाव
७) रागाची चरफड,
८) सभ्यपणाची रीत
१०) निघून जाणे
११) पाणी वाहण्याचे गवंड्याकडील साधन
१३) रोखलेली नजर
१४) भारताचे एक बेट
१५) उत्तराधिकार
१७) शाळेतील फळ्याचा पूर्वीचा रंग
१८) उपस्थित
२०) पुरुषांनी नेसावयाचे रेशमी वस्त्र
२२) निर्यात
२३) मीठ
२५) फक्त, केवळ
२६) संपूर्ण
२८) वेतन
२९) सिद्ध
३१) मागणीचा सततचा हट्ट
३२) अंगरखा
३३) दुखणे, रोग, विकार
३४) मिळवता, कमाई करणारा
३५) उगाच
३६) नारळाचे झाड
३७) खोलवर
३८) पूर्वज
४१) मार्ग
४३) माल साठविण्याची जागा, गुदाम
४५) गवताचे पान
४७) दुर्दशा
४९) लांबट चौकोन
५०) दाह, अग्नी, ज्वाला
५१) कथिल आणि शिसे यांचा मिश्र धातू
५२) राबता, भोगवटा, रिवाज
५३) निमित्त, सबब
५४) अतिशय त्रास देणे, सळो की पळो करणे
५५) नंतर
५६) उथळ, पसरलेला आकार
५७) परीक्षा घेणारा
५८) समानता
५९) तारणारा
६०) वासर
६१) एक रंगीत कंदमूळ
६२) चक्र
६३) गंध
६५) पाक तयार करताना साखरेतून निघणारा मळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## शेतकऱ्यांनी केवळ अन्नदाता नव्हे तर ऊर्जादाता इंधन दाता देखील व्हायला पाहिजे : गडकरी

**नागपूर २२ डिसेंबर :** शेतकऱ्यांनी केवळ अन्नदाता नव्हे तर ऊर्जादाता इंधन दाता देखील व्हायला पाहिजे असे आवाहन केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी गडकरी यांनी आज केले. भारतातील पहिल्या बायो बिटूमेन या साम्रगीवर आधारित राष्ट्रीय महामार्गाचं उद्घाटन आज नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपुरातील मनसर राष्ट्रीय महामार्ग येथे झाले त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचे सहसचिव कमलेश चोधरी, केंद्रीय रस्ते संशोधन संस्था - सीआरआरआयचे संचालक प्रो. मनोरंजन परिड़ा, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य महाव्यवस्थापक आर.पी. सिंह उपस्थित होते.

पिकांच्या अवशेषांपासून – लिग्निन पासून बनवलेल्या बिटूमेनचा वापर करून बांधलेला हा देशातील पहिला राष्ट्रीय महामार्ग आहे. बायो बिटुमेनपासून तयार झालेला हा रस्ता, पारंपारिक, डांबरापासून तयार झालेल्या रस्त्यापेक्षा, टक्के सुरक्षित असून, डांबरात टक्के बायो बिटूमेन मिसळून, नागपूर-मनसर, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पात, १ किलोमीटर लांबीची रस्ता निर्मिती करण्यात आल्याची माहिती गडकरींनी यावेळी दिली. बांबूपासून बायो सी.एन.जी. त्याचप्रमाणे, लिग्निनची निर्मिती करून, यापासून नवे उद्योग सुरू करता येतील. या पर्यावरणपूरक रस्ते निर्मितीपासून, रस्ते निर्मितीच्या खर्चात कपात होईल, रोजगार निर्मिती होईल तसंच शेतमालाच्या ज्वलनापासून होणाऱ्या प्रदूषणाला आळा बसेल असे त्यांनी सांगितले. भारत कृषीप्रधान देश असल्यामुळे पिकांसोबतच त्यांचे अवशेष देखील मोठ्या प्रमाणात शिल्लक राहतात. ते जाळल्यामुळे पर्यावरणाचं नुकसान होतं. त्याचप्रमाणे देशात सुमारे २५ हजार कोटी रुपयाचे बिटूमेन आयात होते.या पारंपारिक बिटूमन वरील अवलंबत्व कमी करण्यासाठी बायोबिटूमीनचे पारंपारिक बिटूमेन मध्ये मिश्रण करणे फायद्याचे ठरते. यामुळे रस्ते बांधणीत सुद्धा खर्च कमी येतो असे त्यांनी यावेळी नमुद केले. रामटेक, भंडारा सारख्या तांदुळ उत्पादक पट्ट्यात भात शेतीनंतर उरणाऱ्या राईस स्ट्रा, हस्क पासून सीएनजी आणि बिटुमन बनविण्याची क्षमता आहे . बांबू पासून बायो सीएनजी त्याचप्रमाणे लिग्निनची निर्मिती करून या तंत्रज्ञावर आधारित नवे उद्योग सुरू करता येतील . भंडारा-गोंदिया यासारख्या धान उत्पादक जिल्ह्यांना यामुळे नवी दिशा मिळेल. गडकरींनी सांगितले .

## राशीभविष्य

**मेष :** तुमच्या उणिवा इतरांसमोर उघड होऊ देऊ नका. व्यवसायात संबंधित लाभ मिळण्याची शक्यता आहे. महत्त्वाच्या कामात विविध अडथळे येतील. नोकरीत स्थान बदलण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** व्यवसायात अपेक्षित लाभ होईल. सर्वांच्या सहकार्याने उत्पन्न चांगले राहील. कामाच्या बाबतीत सावधपणे पुढे जाण्याचा प्रयत्न करत राहाल. गरजा जास्त वाढू देऊ नका.

**मिथुन :** मुलांच्या जबाबदा-या पार पडतील. आज आर्थिक कामात यश मिळण्याची शक्यता संमिश्र राहील. तुमच्या विरोधकांना सक्रिय होऊ देऊ नका. सर्वांशी समन्वय राखेल.

**कर्क :** तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून सहकार्य आणि साहचर्य मिळेल. उपजीविकेच्या क्षेत्रात सकारात्मकता वाढेल. नोकरदार लोकांना नोकरीत महत्त्वाच्या संधी मिळतील.

**सिंह :** आज तुम्ही व्यावसायिक संबंधांचा योग्य वापर कराल. कार्यक्षेत्रातील विविध सर्जनशील आणि अद्वितीय प्रयत्नांना प्रोत्साहन देईल. तुम्हाला उत्तम लोकांशी संपर्क आणि संवादाचा लाभ मिळेल.

**कन्या :** आज तुम्ही नोकरीत चांगली कामगिरी राखाल. उत्पन्न आणि खर्चाचा समतोल राहील. सर्वांना सोबत घेण्यावर भर असेल. बजेटवर लक्ष केंद्रित करा. सावधगिरीने पुढे जा.

**तुळ :** करिअर आणि व्यवसायात सक्रियता दाखवाल. कुटुंबातील ज्येष्ठांचे सहकार्य मिळेल. अनुकूलतेचा जास्तीत जास्त फायदा घेईल. सर्वांचे हित जपण्याचा विचार असेल.

**वृश्चिक :** नियोजनबद्ध पद्धतीने काम करणार. नोकरी करणारे लोक सहका-यांशी समन्वय राखतील. इकडच्या-तिकडच्या गोष्टींमध्ये अडकू नका. कामाच्या ठिकाणी आर्थिक मदत मिळण्याची शक्यता आहे.

**धनु :** मालाची चोरी किंवा अपघात होण्याची भीती राहील. व्यावसायिक सहका-यांचे सहकार्य वाढेल. आज महत्त्वाच्या बातम्या मिळतील. नोकरी आणि व्यवसायात मित्र मित्र बनतील.

**मकर :** आज व्यवसायात नवीन करार करण्याची संधी मिळेल. व्यावसायिकांशी संपर्क लाभदायक ठरेल. विरोधकांच्या कारवायांवर लक्ष ठेवाल. विश्वासघातकी लोकांपासून सावध राहाल.

**कुंभ :** आज प्रियजनांच्या अपयशाकडे दुर्लक्ष करू नका. महत्त्वाचे काम स्वत: करण्याचा प्रयत्न करा. पैशांचे काम इतरांवर सोडू नका. व्यवसाय योजना सोपी राहील. व्यवस्थापनात यश मिळण्याची शक्यता आहे.

**मीन :** कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. उत्पन्नाचे स्रोत वाढतील. नोकरदारांना नवीन व्यवसायात रस वाढेल. आज आर्थिक बाबी सामान्य राहतील.

# मोफत गणवेश योजना शाळा व्यवस्थापन समितीमार्फत राबविल्या जाणार

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीकडून निर्णयाचे स्वागत

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २२ :

समग्र शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांकरीता असलेली मोफत गणवेश योजना पुन्हा पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. याबाबतचा शासन निर्णय शासनाच्या शिक्षण विभागाकडून नुकताच निर्गमित करण्यात आला असून शासनाच्या या निर्णयाचे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीकडून स्वागत करण्यात आले आहे.

शैक्षणिक सत्र 2024-25 मध्ये राज्य शासनाकडून या योजनेच्या कार्यान्वयात बदल करून शाळा व्यवस्थापन समितीचे गणवेश खरेदीचे अधिकार गोठवत शासनस्तरावरून सर्व शाळांना गणवेश पुरविण्याचा निर्णय घेतला होता.

या निर्णयाच्या अंमलबजावणीत आलेल्या अडचणीमुळे या योजनेच्या कार्यान्वयात मोठे अडथळे निर्माण झाले होते परिणामी विद्यार्थ्यांना पहिला गणवेश मिळायला सप्टेंबर उजाडला तर वर्षअखेरीस सुद्धा काही ठिकाणी दुसरा गणवेश अजुनही मिळाला नाही. उपलब्ध झालेल्या गणवेशाचे दर्जाबाबत मोठ्या प्रमाणात ओरड होत आहे.

त्यामुळे शिक्षक संघटना ,पालक संघटना, शिक्षणतज्ञ, शाळा व्यवस्थापन समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासह समाजातील विवीध स्तरातून या योजनेच्या नव्या स्वरूपाला विरोध झाला होता. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने सुद्धा याबाबत आपला विरोध दर्शवत ही योजना पूर्वीप्रमाणेच राबवावी याबाबत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला.

या सर्व बाबींची दखल घेत ही योजना पुर्वीच्या स्वरूपात शाळा व्यवस्थापन समिती मार्फतच राबविण्यात यावी याबाबत चा शासन निर्णय शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून नुकताच निर्गमित करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. शासनाचा हा निर्णय व्यवहार्य असल्याने तो स्वागतार्ह असून या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्राच्या सुरवातीला चांगल्या दर्जाचे गणवेश उपलब्ध होतील, अशी अपेक्षा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे नागपूर जिल्हाध्यक्ष लीलाधर ठाकरे, सरचिटणीस निळकंठ लोहकरे यांचेसह अनिल नासरे, विलास काळमेघ, राजू बोकडे,सुरेश श्रीखंडे, प्रकाश सव्वालाखे, पुष्पा पानसरे कल्पना इंगळे, मीनल देवरणकर, सुरेंद्र कोल्हे, अशोक तोंडे, दिगांबर ठाकरे, अनिल श्रीगिरीवार, धर्मेंद्र गिरडकर, उज्वल रोकडे, विजय उमक, रामदास फड, सुरेश भोसकर, अनिल वाकडे, शैला भिंगारे, अशोक बांते आदींनी केली आहे.

# किट्स मध्ये माजी विद्यार्थ्यांचे सम्मेलन



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २२ :

कविकुलगुरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स (किट्स) रामटेकच्या वतीने २१ डिसेंबर २०२४ रोजी सिल्व्हर ज्युबिली हॉलमध्ये १९९५-१९९९ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचे सम्मेलन आयोजन करण्यात आले. सम्मेलन मधे विविध देशांतील १५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.अविनाश श्रीखंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थितीमधे माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष प्रा. मंगेश जैस्वाल, माजी विद्यार्थी प्रतिनिधी प्राजक्ता कासलीकर (लोटे), सुमंतकुमार भंडारू, सर्व विभागप्रमुख, डीन, माजी विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्राचार्य डॉ.अविनाश श्रीखंडे म्हणाले की, माजी विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याने किट्स ला जगात नावलौकिक मिळवून दिला आहे. किट्सच्या विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्यावा.

अमेरिका, न्यू जर्सी, मनामा, स्वीडन, ऑस्ट्रेलिया, दुबई, बहारीन आणि भारताच्या विविध भागातील माजी विद्यार्थ्यांनी मनोगत मधे म्हणाले की किट्स कॉलेजच्या उत्कृष्ट शिक्षण आणि शिस्तीमुळेच चांगल्या संस्थेत काम करत असल्याचे मत व्यक्त केले. किट्स बद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले की १९९९ मधुन उत्तीर्ण झाल्यानंतर कॉलेजमध्ये आल्याने २५ वर्षांपूर्वीच्या आठवणी जिवंत झाल्या आणि जुन्या मित्रांना भेटून खूप आनंद झाला.

सकाळच्या सत्रात, माजी विद्यार्थ्यांनी किट्स कॅम्पसला भेट दिली आणि समाधान व्यक्त केले. ग्रुपसोबत फोटो काढला आणि विभागप्रमुख आणि प्राध्यापकांशी संवादही साधला.

दुपारच्या सत्रात त्यांनी आपल्या दिवंगत सहकाऱ्यांना श्रद्धांजली वाहिली. प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विक्रम सोमाणी व कीट्सच्या माजी विद्यार्थी संघटनेचे सर्व सदस्य यानी प्रयत्न केले. प्रास्ताविक प्रा. मंगेश जैस्वाल यांनी केले.

# पत्रकार परिषदेच्या नागपूर विभागीय सचिवपदी प्रदीप घुमडवार



■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. २२ :

देशातील मराठी पत्रकारांची मातृसंस्था असलेली राज्यातील एकमेव संस्था अ.भा.मराठी पत्रकार परिषदेच्या नागपूर विभागीय सचिवपदी दै. लोकमतचे कुही तालुका प्रतिनिधी तथा नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रदीप घुमडवार यांची नियुक्ती करण्यात आली.

त्यांची ही निवड अ.भा.मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे यांच्या मार्गदर्शनात अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर यांनी पुणे येथे झालेल्या परिषदेच्या सभेत केली आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या संघटनात्मक रचनेत विभागीय सचिवांना विशेष महत्व आहे.आपल्या विभागात संघटनेचं काम वाढविण्या बरोबरच विभागातील जिल्हा, तालुका संघाशी संपर्क व समन्वय ठेवण्याचे काम ही व्यवस्था करत असते. परिषदेच्या उपक्रमांची आपल्या विभागात अंमल बजावणी करण्याचं काम विभागीय सचिव पार पाडतात. थोडक्यात विभागीय सचिव हे परिषदेचे कान व डोळे म्हणून कार्यरत असतात.

परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी नागपूर विभागासाठी प्रदीप घुमडवार यांची निवड केली आहे. परिषेदेचे मुख्य विश्वस्त,विश्वस्त व पदाधिकारी व संपूर्ण कार्यकारिणी मंडळांनी नागपूर विभागीय सचिव पदी नियुक्ती केल्याने प्रदीप घुमडवार यांनी आभार मानले आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल जिल्ह्यातील सर्व तालुका पत्रकार संघांनी अभिनंदन केले आहे.

# २६ डिसेंबरला तिडके महाविद्यालय आयोजित तालुकास्तरीय संविधान परीक्षा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २२ :

स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या संवैधानिक मूल्याची जाणीव निर्माण करून संविधान प्रेमी समाज निर्माण करणे, या निमित्ताने राज्यघटना समजून घेणे, आणि विद्यार्थ्यांमध्ये संवैधानिक आदशार्बाबत जागरूकता निर्माण करणे आदी उद्देश पूतीर्साठी दिनांक २६ डिसेंबरला श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेकच्या वतीने तालुकास्तरीय संविधान परीक्षा घेण्यात येत आहे.

या समवेत महाविद्यालय आणि माझी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शोध प्रतिभातांचा या उपशीर्षकाखाली क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव दिनांक ३१ डिसेंबर २०२४ ते १, २ जानेवारी २०२५ या दरम्यान विविध उपक्रम राबविले जात आहे. यामध्ये क्रिकेट, कबड्डी , दोनशे मीटर धावणे, लांब उडी, शॉट पुट आणि संविधान पोस्टर स्पर्धा, संविधानावर प्रश्नमंजुषा, देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा, संविधान वॉक इत्यादी क्रीडा, ॲथलेटिक्स व सांस्कृतिक स्पर्धांचा समावेश आहे.

रामटेक तालुक्यातील सर्व हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या शिक्षकाने त्यांच्या विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी करून घेण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर शरद पोकळे तसेच माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष ॲड. संजय खंडेलवाल यांनी केले आहे.

# अखंड नाम कीर्तन महोत्सवाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी, दि. २२ :

कोंढाळी दर वर्षी वार्षिक परंपरेप्रमाणे याही वर्षी सर्व धर्मीय धार्मिक महोत्सवाचे 21 ते 28 डिसेंबर दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. कोंढाळी नगरीतील ठवळेपुरा येथील प्राचीन श्री विठ्ठल रुखमाई देवस्थानच्या वतीने 21 ते 28 डिसेंबर दरम्यान श्रीमद भागवत कथा व श्री ज्ञानेश्वरी पारायण यांचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रसंगी सामूहिक पठणासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक उत्सवानिमित्त 21 ते 28 डिसेंबर या कालावधीत भागवत वाचक ह.भ.प. श्री गोरक्षनाथ भिल्लारे महाराज महाराज यांच्या वाणीतून श्रीमद् भागवत कथा प्रवचन व प्रबोधन होणार असून 26 डिसेंबर रोजी श्री माऊली की पालखीचा भव्य पालखी धर्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून 28 डिसेंबर रोजी दुपारी 12 वाजता ह.भ.प. पंकज महाराज पवार यांच्या हस्ते गोपाल कला कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री विठ्ठल रुख्माई देवस्थानच्या वतीने 21 ते 28 डिसेंबर दरम्यान श्रीमद भागवत कथा व श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण निमित्त आयोजित कीर्तन महोत्सवात 21 ह.भ.प.श्री सोपान काका काळपांडे - 22 डिसेंबर - ह.भ.प. श्री. अनिल महाराज दातार, 23 डिसेंबर - ह.भ.प. श्री. कृष्णा पाटील, 24 डिसेंबर ह.भ.प. श्री 08 मौनानंद महाराज, 25 डिसेंबर- ह.भ.प. श्री. शास्त्री चंद्रशेखर महाराज वारे, 26 डिसेंबर - ह.भ.प. श्री हरिओम महाराज निंभोरकर, 27 डिसेंबर डिसेंबर - ह भ प श्री पंकज महाजन पवार तर काल्याचे कीर्तन महोत्सव 28 डिसेंबर रोजी दुपारी 12 वाजल्यापासून ह.भ.प. पंकज महाराज पवार यांचे काल्याचे किर्तन आदी धार्मिक उत्सवासह, या धार्मिक उत्सवानिमित्त दैनंदिन कार्यक्रम - श्रींचा अभिषेक सकाळी 05-30, काकडा 06-07, काकडा 07-30 ते 09-30, श्रीमद भागवत कथा पारायण, 10-00 -12-00 आणि 03-30 ते 05-30 श्रीमद भागवत पुराण कथा, श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण-07-30-ते 09-30 व 01-30-03-00-श्री ज्ञानेश्वरी महापुराण कथा, तसेच दैनंदिन कार्यक्रम 06-00 ते 07-00 श्री हरीपाठ आणि रात्री-09 ते 11-00 श्री हरी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच या कार्यक्रमानिमित्त श्री संत गुलाबबाबा आश्रमात सकाळी 06 ते 07 या वेळेत प्राणायाम व योग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती अखंड नाम संकीर्तन महोत्सव आयोजन समिती कोंढाळी यांनी दिली आहे.

# गरिबांना ब्लँकेट, टी-शर्ट, चप्पल वाटप



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २२ :

थंडीत थरथर कापून पहा उन्हात तपुन पहा आणि या गरिबांना गरिबी काय आहे विचारूण तो पहा "तेजस संस्थेचे स्तुत्य कार्य गरिबी म्हणजे काय, यावर काम करणारी तेजस बहुउद्देशीय संस्था माणुसकीचा धर्मला समोर घेऊन कार्य करणारी, थंडीत काही लोकांचा थरकाप उडत असल्याची वार्ता अरगुलेवार यांना मिळताच त्यांनी संस्थेचे सहकारी रवींद्र कुमार (सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर बेसा) आणि राजेश काडे (इतवारी नागपूर) यांना माहिती दिली. यांच्याशी संपर्क साधून त्यांना सांगितले की, रवींद्र कुमार यांनी ५० ब्लँकेट राजेश काढ़े २५० टी-शर्ट्स संस्थेला भेट दिल्याने काही मुलांच्या पायात चप्पल नसल्यामुळे अरगुलेवार यांनी ५० जोडी चप्पल घेतल्या.

राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचा ६८ वा परिनिर्वाण दिवस निमित्ताने १९ डिसेंबर २०२४ रोजी कामठी उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रभारी डॉ नयना दुफारे, डॉ.प्रशांत डांगोरे, ज्येष्ठ पत्रकार अढाऊ गुरुजी, पत्रकार एम.ए.जब्बार, संस्थेचे सहकारी कुक्कू चाना, समाजिक कार्यकर्ता आनंद मामड़ीवार, रोशन क्षीरसागर, आनंद मैरेज ब्यूरोचे अध्यक्ष रवींद्र तांडेकर, नगरपरिषद कामठी कर्मचारी दर्शन गोंडाणे, झिबलजी, करण इमले, गोलू तालेवार, अभय पेटरे, तेजस अरगुलेवार, संस्थेचे उपाध्यक्ष देविदास पेटारे, संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार, यांचे शुभहस्ते २० कम्बल आणि मोठे लोकांना २० टी-शर्ट आणि लहान मुलाना १० टीशर्ट १० जोड़ चप्पल तेजस संस्थेने मानवतेच्या धमार्चे पालन करत भेट दिली.

# क्रिडा स्पर्धेत खेळाडुंनी दाखविले क्रीडा कौशल्य



■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. २२ :

नुकताच १९ डिसेंबर 2024 रोजी मौदा येथील तालुका क्रीडा संकुल येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव तसेच जनता विद्यालय मौदा येथे तालुकास्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी व खेळाडुंनी विविध क्रीडा प्रकारात क्रीडा कौशल्य प्रदर्शित केले.

या क्रीडा महोत्सव कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ता कोकड्डे यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित म्हणून मौदा पंचायत समिती सभापती स्वप्नील श्रावणकर , जी. प. सदस्य तापेश्वर वैघ, खंडविकास अधिकारी विजय झिंगरे, गटशिक्षणाधिकारी किरण चीनकुरे, अनिल बुराडे, दुर्गा ठाकरे, टिकाराम सपाटे, सुरेश मेश्राम, संकेत मरसकोल्हे, रामेश्वर भक्तावर्ती, केंद्र प्रमुख राजू आंबिलकर , रुस्तम मोटघरे, शिल्पा सुर्यवंशी, अनिल पत्रे, अरविंद भिवगडे, निर्मला मस्कर. नामदेव ठोंबरे , तालुक्यातील सर्व शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, केंद्रस्तरांवर विजयी चमूंचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मौदा पंचायत समिती सभापती स्वप्नील श्रावणकर यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना मोबाईलच्या मागे न लागता मैदानावरील खेळ खेळल्याने आरोग्य सुदृढ राहील यासाठी दररोज खेळावे. क्रीडा क्षेत्रात स्वतः तालुक्याचा व जिल्ह्याचा, नावलौकीक करावा असे आवाहन केले. जिल्हा क्रीडा संकुल येथे क्रीडा उपक्रम विषयक व क्रीडा क्षेत्र तसेच त्यामधील करीयर संबंधात परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

**विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन**

तालुका स्तरीय या क्रीडा स्पर्धेत कबड्डी, खो-खो, लंगडी. कबड्डी. नृत्य. विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यातील विजयी व उपविजयी संघ, स्पर्धकांना पारीतोषीक देऊन गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे तालुक्यातील विविध खेळातील तालुका खेळाडू यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# सर्पमित्र आकाश कुंडाबोर यांनी दिले सापाला जीवनदान



■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. २२ :

मोवाड ते बेलोना रोडवर साप आणि मुंगूस यांची जोरदार लढाई चालू होती. त्या लढाईच्या कारणामुळे सर्वत्र रस्ता जाम झाला होता ती लढाई पाहताच तत्काळ बेलोना येथील नागरिक अज्जू ठाकूर यांनी मोवाड येथील प्रसिद्ध सर्पमित्र आकाश कुंडाबोर यांना तत्काळ मोबाईलवर संपर्क साधून तत्काळ बोलाविण्यात आले. त्यांच्या सोबत मोवाड येथील राष्ट्रवादीचे सामाजिक कार्यकर्ते विनय वैद्य, गणेश धकीते, मंगेश देवघरे, हे सुद्धा तेथे आले असता सर्पमित्र आकाश कुंडाबोर याला मदत करत सापाला सुरक्षित पकडून जंगलात सोडण्यात आले.

त्यांच्या या कर्तबगारीला येथील नागरिकांनी त्यांचे तोंड भरून कौतुक केले या धाडसी कामामुळे आकाश वयाच्या २१ व्या वषार्पासून साप पकडण्याचे धाडसी काम करत आत्तापर्यंत त्यांनी जवळपास दोन हजाराच्या वर विषारी, बिनविषारी, घोणस, अजगर, नाग, अशा अनेक विषारी जातीच्या सापाला पकडून जीवनदान दिले आहे. हे धाडसी काम करून लोकांचा बचाव व सुरक्षितपणामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे, ते नरखेड तालुक्यातच नव्हे तर नागपूर जिल्ह्यात सुद्धा साप पकडण्याचे धाडसी काम करत आहे.

# विद्युत प्रवाहाने वन्यप्राणी चितळाची शिकार



■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. २२ :

तालुक्यातील उमरेड-करांडला अभयारण्यालगत बुट्टीटोला येथे वन्यप्राणी चितळाची विद्युत प्रवाह लावून शिकार करून त्याचे मांस कापून गावात वाटप केले असल्याची माहिती मिळताच वनविभागातर्फे आरोपींवर गुन्हा दाखल करत अटक करण्यात आली आहे.

उत्तर उमरेड वनपरिक्षेत्रात (16 डिसें.) उमरेड-करांडला अभयारण्यालगत मौजा-बुट्टीटोला ता. कुही येथे वन्यप्राणी चितळाची विद्युत प्रवाह लावून शिकार केली व त्याचे मांस कापून गावात वाटप केले असल्याची माहिती मिळताच क्षेत्र सहायक पचखेडी यांचे चमूने आरोपी आरोपी लक्ष्मण किशन मडावी वय-43 वर्ष रा. बुट्टीटोला पो. डोंगरमौदा ता. कुही जि. नागपूर यांना ताब्यात घेऊन वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, 1972 चे कलम 2 (16), 9, 39, 48अ, 49 नुसार वनगुन्हा नोंदविण्यात आला.

आरोपीच्या राहते घरून वन्यप्राण्याचे अंदाजे ३ किलो कच्चे मांस जप्त करण्यात आले. दिनांक 18/12/2024 रोजी आरोपीस मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कुही येथे दाखल केले असता मा. न्यायालयानी आरोपीस दिनांक-18 ते 20 डिसें. पर्यंत 03 दिवसाची वनकोठडी सुनावली.

तपासा दरम्यान आरोपी लक्ष्मण किशन मडावी याने वन्यप्राणी चितळाचे मांस वाटप केलेल्या व वनगुन्ह्यात सहभागी असलेल्या आरोपींची नावे सांगितली असता दिनांक 19 रोजी आणखी 10 आरोपींना अटक करण्यात आली. सदर आरोपीची नावे 1) सचिन अशोक नेवारे वय-30 वर्ष रा. बुट्टीटोला पो. डोंगरमौदा ता. कुही जि. नागपूर 2) सुरज देवराव कारसरपे वय-24 वर्ष रा. बुट्टीटोला पो. डोंगरमौदा 3) लक्ष्मण शामराव नेवारे वय-36 वर्ष रा. बुट्टीटोला पो. डोंगरमौदा 4) भगवान शामराव नेवारे वय-29 वर्ष रा. बुट्टीटोला पो. डोंगरमौदा 5) साहिल रामदास शेंदरे वय-17 वर्ष रा. बुट्टीटोला पो. डोंगरमौदा 6) ईश्वर श्रावण राऊत वय-71 वर्ष रा. बुट्टीटोला पो. डोंगरमौदा 7) रोहित नत्थू वारजूरकर वय-19 वर्ष रा. धामणा पो. डोंगरमौदा 8) दिनेश अशोक नेवारे वय-32 वर्ष रा. बुट्टीटोला पो. डोंगरमौदा 9) नरेंद्र ईश्वर कुंभरे वय-45 वर्ष रा. धामणा पो. डोंगरमौदा 10) रोशन बंडू मांढरे वय-32 वर्ष रा. धामणा पो. डोंगरमौदा सर्व राहणार ता. कुही जि. नागपूर असे आहेत.

सर्व आरोपी यांना न्यायालय कुही येथे दाखल केले असता पुढील तपासाकरीता मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कुही यांनी सर्व 11 आरोपीला 15 दिवसाची न्यायालयीन कोठडी (टउफ) सुनावली आहे. सर्व 11 आरोपी यांना सेंट्रल जेल नागपूर येथे रवानगी करण्यात आली असून या प्रकरणाचा पुढील तपास डॉ. भारत सिह हाडा, उपवनसंरक्षक नागपूर वनविभाग नागपूर व मनोज धनविजय, सहायक वनसंरक्षक, उमरेड यांचे मार्गदर्शनाखाली पी. डी. बाभळे वनपरिक्षेत्र अधिकारी उत्तर उमरेड हे करीत आहेत.

प्रकरणाची कार्यवाही आर. डब्लू. पिल्लेवार क्षेत्रसहायक पचखेडी, एस. यु. चव्हाण क्षेत्रसहायक कुही, नितीन सेलोकर वनरक्षक मांढळ, सीमा हरडे वनरक्षक वेलतूर, ए. एम. किरमरे वनरक्षक पचखेडी, सीमा भोयर, लक्ष्मी शेंडे, निराशा पिपरे, वनरक्षक व श्री. आस्वले, तितरमारे वनमजूर यांनी पूर्ण केली.

# अटल भू-जल अभियानाच्या एकेरी साईडच्या कामाची पाहणी

## ग्राम पंचायत खुर्सापार येथील प्रकल्पाची पाहणी

■ महासागर प्रतिनिधी
कोंढाळी , दि. २२ :

महाराष्ट्र राज्यातील उपराजधानी व सध्याची राजधानी नागपूरचे काटोल तालुक्यातील खुसार्पार येथील अटल भू-जल अभियानाच्या माध्यमातून सुरू असलेल्या एकेरी साईड कामांच्या पाहणी साठी डॉ. भालचंद्र चव्हाण आयुक्त तथा प्रकल्प संचालक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा पुणे महाराष्ट्र राज्य पुणे, डॉ. प्रवीण कथने प्रकल्प समन्वयक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा महाराष्ट्र राज्य पुणे, डॉ.चंद्रकांत भोयर प्रादेशिक उपसंचालक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा नागपूर विभाग नागपूर, यांनी खुसार्पार येथे भेट देऊन अटल भुजल योजना व ऐकरीसाईडच्या कामाची पाहणी केली.

समोरील सूचना दिल्या यावेळी डॉ. वर्षा पी. माने वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा नागपूर, खुसार्पार ग्राम पंचायतचे माजी सरपंच सुधीर गोतमारे, विद्यमान सरपंच मीनाताई कातलाम उप सरपंच विनायकराव साठे. विलास कातलाम, युवा शेतकरी पप्पू गोतमारे, माणिकराव काळे,

डॉ.शिवाजी पदमने वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा भंडारा, डॉ.अभिजीत धाराशिवकर सहाय्यक भूवैज्ञानिक भु.स.वि.यं.नागपुर, नंदकिशोर बोरकर सहाय्यक भूवैज्ञानिक भू. स. वि.यं नागपूर, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील (माहिती शिक्षण संवाद तज्ञ ), निलेश खंडारे ,(कृषीतज्ञ) प्रतीक हेडाऊ, सद्भावना ग्रामीण विकास संस्था वर्धासमन्वयक ममता बालपांडे, कृषी तज्ञ गौतम मेश्राम, भूजल तज्ञ कुमारी विश्वधारीणी मुंगणकर, जलसंधारण तज्ञ मयूर दहिजोड, माहिती शिक्षण संवाद तज्ञ स्वप्नील बांगर समुदाय संघटक मनीष ढोके उपस्थित होते.

**NOTICE**

Seller Abraham Lainal EmmanuelPurchaser Kasim Ahemad Pathan
Property details Plot no. 13, Khasara no 252/2, City Survey No.1027, 1925 Sq.ft., Scar, Plot No. 13 Raut Layout Katol Road Nagpur - 440013.
Mauza - Zingabai Takli.
Note : Any Individual with issue related to this property is requested to contact us within the time period of 3 days (23/12/2024 to 25/12/2024) of this period will not be any responsibal any claim or enquiries.
Contact 8626013982

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# कॅलिडोस्कोप

## ३१ डिसेंबरपर्यंत आजारी रजा नाही




सोशल मीडियावर एक पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. व्हायरल झालेल्या या पोस्टमध्ये कार्यालयाचे नियम स्पष्ट करण्यात आले. ३१ डिसेंबरपर्यंत कर्मचाऱ्यांना सुटी मिळणार नसल्याचेही सांगण्यात आले. कंपनीच्या या ऑर्डरची सोशल मीडियावर जोरदार चर्चा झाली. याशिवाय कर्मचाऱ्यांना आजारी रजाही मिळणार नाही, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. याचा सरळ अर्थ असा की, कर्मचारी आजारी असला तरी त्याला कार्यालयात यावे लागेल.

या आदेशाच्या प्रतीमध्ये २५ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत कोणत्याही कर्मचाऱ्याला सुटी मिळणार नाही, असे लिहिले होते. याशिवाय कंपनीने आजारी रजेवर बंदी घातली आहे. यावर कंपनीचा युक्तिवाद असा आहे, की हा कालावधी सर्वात व्यस्त काळ आहे. भरपूर काम आहे, त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहणे खूप महत्वाचे आहे. त्यामुळे आम्ही सर्व प्रकारच्या सुट्ट्यांवर बंदी घातली आहे. या व्हायरल पोस्टमध्ये कंपनीचे नाव समोर आले नसले, तरी ही कंपनी आपल्या तुघलगी फर्मानामुळे सतत चर्चेत असते. नुकतेच पुण्यातील एका कंपनीत काम करणाऱ्या तरुणीचा मृत्यू झाला होता. त्याचे कारण विषारी कार्यसंस्कृती मानले जात होते. यानंतर बाजार नियामक 'सेबी'च्या कर्मचाऱ्यांनीही विषारी कार्यसंस्कृतीची तक्रार केली. अर्थ मंत्रालयाला लिहिलेल्या पत्रात असे म्हटले आहे, की 'सेबी'चे नेतृत्व विषारी कार्य संस्कृतीला प्रोत्साहन देत आहे.



## भिकाऱ्याने दिली पाच कोटींची मेजवानी!

पाकिस्तानातून एका मेजवानीत मिठाई, शेवया, बिर्याणी, पुलाव, कोरमा आणि काय काय नाही अशी धक्कादायक घटना समोर आली आहे. या मेजवानीला सुमारे २० हजार लोक उपस्थित होते. या घटनेतील आश्चर्यकारक बाब म्हणजे ज्या कुटुंबाने या मेजवानीचे आयोजन केले होते, ते कुटुंब व्यवसायाने भिकारी असून भीक मागून आपला उदरनिर्वाह चालवते. राजकीय आणि आर्थिक अस्थिरतेमुळे अनेकदा टीकेला सामोरे जाणाऱ्या पाकिस्तानलाही 'भिकारी देश' या लेबलचा फटका बसला आहे; मात्र एक अनोखी आणि धक्कादायक बाब म्हणजे देशातील व्यावसायिक भिकारीही प्रचंड संपत्तीचे मालक आहेत आणि कधी कधी समाजातील त्यांच्या 'भिकारी' या ओळखीच्या वर उठून लोकांना धक्का बसेल अशी कामे करतात. एका रिपोर्टनुसार, हा कार्यक्रम गुजरनवाला येथील राहवली रेल्वे स्टेशनजवळ झाला. पंजाबच्या विविध भागातून हजारो लोक यात सहभागी झाले होते. भिकारी कुटुंबाने या मेजवानीवर सुमारे पाच कोटी पाकिस्तानी रुपये खर्च केले, जे सुमारे १.२५ कोटी भारतीय रुपयांच्या समतुल्य आहे. ही बातमी पाकिस्तानातील एका कुटुंबाची आहे, जी भीक मागून जगते;पण आपल्या मेहनतीने आणि प्रामाणिकपणाने त्यांनी इतकी प्रगती केली, की त्यांनी त्यांच्या आजीच्या चाळीसाव्या (चाळीसाव्या दिवसाच्या प्रार्थनेच्या दिवशी) २०,००० लोकांना जेवण दिले. परिस्थिती कशीही असो, मेहनत आणि चांगल्या हेतूने कोणतेही ध्येय गाठता येते, हे या कुटुंबाने दाखवून दिले.

## एका केळीची किंमत ५२ कोटी!


केळी खाण्यासाठी जास्त पैसे खर्च करावे लागत नाहीत. बाजारात केळी ४० ते ७० रुपये डझनने विकली जात आहेत; पण एका सामान्य केळीची किंमत ५२ कोटी रुपये असू शकते? होय, न्यूयॉर्कमध्ये एका लिलावादरम्यान एक केळी ५२ कोटी रुपयांना विकली गेली!

भिंतीवर टेप केलेल्या केळीच्या वैचारिक कलाकृतीला न्यूयॉर्कच्या लिलावात तब्बल ६.२ दशलक्ष डॉलर्स मिळाले. त्यात प्रसिद्ध क्रिप्टोकरन्सी व्यावसायिकाकडून सर्वाधिक बोली लागली. 'कॉमेडियन' आणि इटालियन कलाकार Maurizio Cattelan यांनी तयार केलेल्या, केळीच्या या कलाकृतीने २०१९ मध्ये आर्ट बासेल मियामी बीचवर पदार्पण केले, तेव्हा जगाचे लक्ष वेधून घेतले. चांदीच्या डक्ट टेपसह पांढऱ्या भिंतीवर सुरक्षित केलेली एकटी पिवळी केळी ही एक युक्ती आहे की कलाविश्वाची खरी उत्कृष्ट नमुना आहे यावर पाहुणे वाद घालत राहिले. त्यामुळे भाव वाढले. बोली आठ लाख डॉलरपासून सुरू झाली; परंतु काही मिनिटांतच ती ४० लाख डॉलरपर्यंत गेली.

लिलावकर्ता ऑलिव्हर बार्कर म्हणाला, की खरेदीदार अतिरिक्त १ दशलक्ष डॉलर्स देईल. अंतिम हॅमरची किंमत ५.२ दशलक्ष डॉलर झाली, त्यानंतर एका व्यावसायिकाने ही केळी ५०२ दशलक्ष डॉलरमध्ये विकत घेतली.

असे असतानाही लिलावाचे पैसेही व्यापारी १० लाख रुपयांच्या खोलीत भरणार आहेत. त्यानुसार या केळीची किंमत ६.२ दशलक्ष रुपये आहे जी भारतीय बाजारपेठेत ५२ कोटी रुपयांच्या समतुल्य आहे. ही बातमी सोशल मीडियावर पसरताच लोकांमध्ये खळबळ उडाली आणि ५२ कोटी रुपये किमतीच्या केळीमध्ये विशेष काय आहे याची उत्सुकता निर्माण झाली. सोशल मीडिया यूजर्सनी केळी विकत घेतलेल्या व्यक्तीबद्दल ही व्यक्ती एकतर खूप श्रीमंत आहे किंवा तो वेडा झाला आहे, अशा प्रतिक्रिया नोंदवल्या.





## झेंगडू शहरात सात सूर्य!



चीनच्या चेंगडू शहराच्या आकाशात अचानक सात सूर्य दिसायला लागले! हे अप्रतिम दृश्य पाहून तुमचा तुमच्या डोळ्यांवर विश्वास बसणार नाही. अनेक वेळा निसर्ग असे काही दाखवतो, जे केवळ निसर्गाच्या नियमांमुळेच शक्य होते. महान योद्धे निसर्गाचे शोषण पाहून आश्चर्यचकित आणि अस्वस्थ होतात. अशीच एक घटना चीनमधून समोर आली आहे, जिथे आकाशात असे दृश्य दिसले, की कल्पना करणेही अशक्य होते. चीनच्या आकाशात एकाच वेळी सात सूर्य दिसले आणि पाहणारे लोकही थक्क झाले. हे प्रकरण चीनच्या चेंगडू शहराचे आहे, जिथे आकाशात एकाच वेळी सात सूर्य दिसले, ही विलक्षण आणि अविश्वसनीय घटना तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केली. १८ ऑगस्ट रोजी काढलेला हा व्हिडीओ काही वेळातच सोशल मीडियावर व्हायरल झाला. हे विलक्षण दृश्य आकाशात सुमारे एक मिनिट दिसले. 'डिम सन डेली एचके'ने दिलेल्या वृत्तानुसार, चेंगडू येथील एका स्थानिक व्यक्तीने हा व्हिडीओ आपल्या कॅमेऱ्यात कैद केला आहे. या व्यक्तीने सांगितले, की आकाशात हे दृश्य पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले आणि लोकांचे पाय जिथे होते तिथेच थांबले. ही घटना चीनमधील लोकांमध्ये चर्चेचा विषय बनली आहे. तज्ज्ञांचे असे मत आहे, की आकाशात सात सूर्य नाहीत किंवा ते कुठल्या जादूने आलेले नाहीत, उलट परावर्तनाचा परिणाम म्हणजे आकाशात असे दृश्य दिसले आहे. प्रकाशाच्या परावर्तनातील ऑप्टिकल भ्रमामुळे ही घटना घडली आहे. या घटनेचे मुख्य कारण म्हणजे प्रकाशाच्या अपवर्तनाची क्रिया आणि स्तरित काचेच्या परावर्तनामुळे होणारा सामान्य ऑप्टिकल भ्रम आहे.

## अन्नदानाचा विश्वविक्रम

तेलंगणाच्या गौतमकुमारने अनोखा विश्वविक्रम केला आहे. त्याने दिवसभरात एक हजारपेक्षा जास्त गरीबांना अन्नदान केलं. 'युनिव्हर्सल बुक ऑफ रेकॉर्डस'ने त्याच्या या कामगिरीची दखल घेतली आहे. या संस्थेतर्फे गौतमचा सन्मानही करण्यात आला. हैदराबादमध्ये रहाणाऱ्या गौतमकुमारची स्वत:ची एनजीओ आहे. या एनजीओच्या माध्यमातून तो सामाजिक कार्य करतो. २०१४ मध्ये त्याने ही एनजीओ सुरू केली. सर्व नीडी असं त्याच्या संस्थेचं नाव असून कोणालाही उपाशी झोपावं लागू नये, हा या संस्था स्थापनेमागचा उद्देश आहे. जास्तीतजास्त लोकांना अन्नदान करण्याचा संकल्प त्याने सोडला आहे. त्याच्या संस्थेचे १४० कार्यकर्ते यासाठी झटत असतात. गौतमकुमारने हैदराबादमधल्या तीन वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन गरजूंना भोजन दिलं. आधी तो गांधी हॉस्पिटलमध्ये गेला. तिथल्या गरीब रुग्णांना खायला दिलं. मग राजेंद्र नगरमध्ये जाऊन अन्नदान केलं आणि शेवटी अम्मा नन्ना अनाथालयात तो गेला. हा विक्रम केल्यानंतर 'युनिव्हर्सल बुक ऑफ रेकॉर्डस'ने त्याला प्रमाणपत्र दिलं.



## मिठाच्या खाणींमधला स्पा

बेलारूसमध्ये वैद्यकीय पर्यटनाचं प्रमाण बरंच जास्त आहे. इथे मिठाच्या खाणींचं रुपांतर स्पामध्ये करण्यात आलं आहे. हे अनोखे स्पा लोकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरत आहेत. जमिनीपासून ४०० मीटर खोल हे स्पा आहेत. या स्पामध्ये उपचार करून घेण्यासाठी दरवर्षी काही हजार पर्यटक बेलारूसला येतात. बेलारूसमधल्या खाणी तसंच बोगद्यांमध्ये मीठ आणि पोटॅशियम मोठ्या प्रमाणावर आढळतं. याचा उपयोग विविध विकारांवरच्या उपचारांसाठी केला जातो. इथे येणाऱ्या लोकांना मन:शांती तर मिळतेच शिवाय अस्थमा, ॲलर्जी आणि श्वसनाचे विकारही दूर होतात. राजधानी मिन्स्कपासून १३० किलोमीटर अंतरावर १९९१ मध्ये पहिलं नॅशनल स्पीलिओथेरेपी क्लिनिक सुरू झालं. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांमध्ये रशियन लोकांची संख्या अधिक असते. इथे टीव्ही, इंटरनेटसारख्या सोयी नाहीत पण विविध प्रकारचे व्यायाम करता येतात. काही काळ निवांतपणे घालवता येतो. मीठाच्या खाणींमधल्या स्पामध्ये २ ते ३ दिवस रहाता येतं. दोन आठवडे रहाण्यासाठी एक हजार डॉलर म्हणजे ७० हजार रुपये इतका खर्च आहे. एक वेगळा अनुभव म्हणून इथे जायला काहीच हरकत नाही.



## वराशिवाय होतं लग्न

लग्नात वराला म्हणजे नवऱ्या मुलाला प्रचंड महत्त्व असतं. त्याची सरबराई केली जाते. प्रत्येक इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न होतो. वधू पक्षाकडचे तर वराच्या दिमतीला हजर असतात. वरातीत नवरा मुलगा घोड्यावर बसून मिरवत असत-ो. त्याच्या खाण्यापिण्याची पूर्ण व्यवस्था केलेली असते. मात्र आपल्या देशात लग्नाच्या विविध पद्धती असतात. प्रथा, परंपरा आणि विधी असतात. प्रत्येक जात, धम िनुसार लग्नविधींमध्ये वैविध्य आढळतं. काही लग्नांमध्ये महिला वरातीत जात नाहीत. मात्र एका समाजातल्या लग्नात नवरा मुलगा वरातीत नसतो. राजस्थानातल्या छोटा उदयपूर भागातल्या आदिवासी समाजात अशी परंपरा आहे. लग्नात नवऱ्या मुलाऐवजी त्याची अविवाहित बहिण किंवा कुटुंबातली अविवाहित महिला सहभागी होते. नवरा मुलगा आईसोबत घरीच थांबतो. या प्रथेबद्दल ऐकून कोणालाही आश्चर्य वाटेल. वरातीत वराची बहिणच सहभागी होते. गंमत म्हणजे लग्नाचे सगळे विधी तिच पार पाडते. सप्तपदीचा विधीही ही बहिणच पार पाडते. इथल्या तीन गावांमध्ये अशी परंपरा आहे. ही प्रथा मोडली तर वाईट गोष्टी घडतील या भीतीने कोणीही ही पद्धत मोडायला धजावत नाही. नवऱ्याशिवाय संपन्न होणारं लग्न म्हणजे विचित्रच प्रकार म्हणायला हवा.





## मधमाशा झाल्या गायब

जागतिक तापमान वाढ, कमी होत जाणारे अधिवास यामुळे प्राणी, पक्षी, किटक यांची संख्या कमी होत चालली आहे. प्राणी-पक्ष्यांच्या अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. याचा जीवसृष्टीवर विपरित परिणाम होऊ शकतो. इंग्लंडच्या पूर्व भागात मधमाश्यांच्या १७ प्रजाती नष्ट झाल्याचं अधिकृतरित्या जाहीर करण्यात आलं आहे. यात ग्रेट येलो बंबल बी आणि पॉटर फ्लॉवर बी सारख्या दुर्मिळ प्रजातीच्या मधमाश्यांचा समावेश आहे. वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर च्या अहवालात ही बाब नमूद करण्यात आली आहे. या घटनेकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखं नाही. ही धोक्याची घंटा असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेत मधमाश्यांचं मोठं योगदान आहे. मधमाश्यांच्या कमी संख्येमुळे शेतकऱ्यांपासून ग्राहकांपर्यंत प्रत्येकाला त्रास होणार आहे. ब्रिटनमधल्या सफरचंदाच्या शेतीसाठी मधमाश्यांची गरज असते.

या मधमाश्या विविध माध्यमातून ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेत भारतीय चलनात सहा हजार कोटी रुपयांचं योगदान देत होत्या. मात्र आता इथली शेती, मधुमक्षिका पालन, फळांची लावगड यावर परिणाम होणार आहे. या प्रश्नाकडे गांभीर्याने बघण्याची गरज सर्वच स्तरातून व्यक्त होते आहे.

## वाजतच नाहीत बारा



बाराचा टोला पडला की चांगलीच धावपळ सुरू होते. मध्यान्ह सुरू झाल्याची ही वर्दी असते. रात्रीच्या बाराच्या टोल्याला सर्व जण झोपायची तयारी करू लागतात. घड्याळात नेमाने दोन वेळा बाराचे टोले पडतात. पण एखाद्या घड्याळ्यात बारा वाजतच नसतील तर? जगात असं एक घड्याळ आहे. स्वीत्झर्लंडच्या सोलोथर्न शहरात हे विचित्र घड्याळ आहे. या शहरातल्या टाउन स्क्वेअरमध्ये हे घड्याळ पहायला मिळतं. गंमत म्हणजे या घड्याळात फक्त ११ आकडे आहेत. १२ हा आकडाच नाही. १२ न वाजणारी बरीच घड्याळं इथे आहेत. यामागचं कारण मजेशीर आहे. इथल्या लोकांना ११ हा आकडा खूप आवडतो. त्यांच्यादृष्टीने हा आकडा शुभ मानला जातो. या शहरातल्या अनेक वस्तूंची रचना अकरा आकड्याप्रमाणे केल्याचंही पहायला मिळतं. या शहरातल्या चर्च आणि चॅपलची संख्या ११ आहे. इथलं सेंट उसूर्स हे प्रमुख चर्च ११ वर्षांत बांधून तयार झालं होतं. या चर्चला ११ दरवाजे आहेत तसंच ११ घंटा बांधण्यात आल्या आहेत. इथले लोक अकरावा वाढदिवस मोठ्या जल्लोषात साजरा करतात. याबाबतच्या काही आख्यायिका इथे प्रसिद्ध आहेत.

## एव्हरेस्टचे कलंदर

जगातलं सर्वात उंच एव्हरेस्ट शिखर सर करण्याची चढाओढ सध्या पहायला मिळते आहे. एव्हरेस्टच्या मार्गावर गिर्यारोहकांची मोठी गर्दी झाली आहे. इथे ट्रॅफिक जॅमसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. एव्हरेस्टची चढाई खूप कठीण असते. मात्र शेर्पा कामी रिता यांनी २४ वेळा हे शिखर सर केलं आहे. अशी कामगिरी करणारे ते जगातले पहिलेच व्यक्ती आहेत. वयाच्या बाराव्या वर्षापासून कामी रिता एव्हरेस्टच्या बेस कँपपर्यंत गिर्यारोहकांच्या गरजेचं सामान पोहोचवण्याचं काम करतात. जवळपास ११ वर्षं त्यांनी हे काम केलं.

१९९२ मध्ये त्यांना पहिल्यांदा एव्हरेस्ट चढण्याची संधी मिळाली. ही चढाई करण्याआधी त्यांनी एव्हरेस्टच्या वातावरणाची पूर्ण माहिती घेतली. १९९४ मध्ये कामी पहिल्यांदा एव्हरेस्टच्या कँप ४ पर्यंत म्हणजे २५,९३८ फूट उंचीवर पोहोचले. त्यानंतर त्यांनी नियमितपणे अशी चढाई सुरू केली. एका वर्षात दोन वेळाही ते एव्हरेस्ट चढले आहेत. शेरपा म्हणून जगातल्या सात खंडांमधल्या सात शिखरांवर चढण्याचा विक्रमही कामी रिता यांच्या नावे आहे. नेपाळमधल्या थेमू गावात कामी रिताचा जन्म झाला. वडिलांना एव्हरेस्ट चढण्याची खूप इच्छा होती. मात्र काही कारणांमुळे हे शक्य झालं नााही.

आता कामी आपल्या वडिलांची ही इच्छा पूर्ण करत आहेत. कामीचे मोठे भाऊ लाकपा रिताही १७ वेळा एव्हरेस्ट चढले आहेत. आपण अजून तंदुरूस्त असून साठीपर्यंत एव्हरेस्ट सर करत रहाणार असल्याचं कामी रिता सांगतात. त्यांच्या या उत्साहाला सलाम केला पाहिजे.




आपलं नागपूर, आपला उत्सव... खासदार सांस्कृतिक महोत्सव
संकल्पना: ना. नितीन गडकरी
खासदार सांस्कृतिक महोत्सव
सोमवार, 23 डिसेंबर 2024
सायं 6:00 वा.
स्थळ: ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय क्रीडा चौक, हनुमान नगर, नागपूर
जुबिन नौटियाल
'लाईव्ह इन कॉन्सर्ट
विनीत: खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, नागपूर
प्रा. अनिल सोले अध्यक्ष
दीपक खिरवडकर उपाध्यक्ष
डॉ.गौरीशंकर पाराशर उपाध्यक्ष
अशोक मानकर उपाध्यक्ष
दिलीप जाधव उपाध्यक्ष
जयप्रकाश गुप्ता सचिव
प्रा. राजेश बागडी कोषाध्यक्ष
बाळ कुळकर्णी सदस्य
सौ. मायाताई इवनाते सदस्य
हाजी अब्दुल कदीर सदस्य
सारंग गडकरी सदस्य
अविनाश घुशे सदस्य
चेतन कायरकर सदस्य
आशिष वांदिले सदस्य
संदीप गवई सदस्य
सौ. रेणुका देशकर सदस्य
संजय गुळकरी(C.A.) सदस्य
भोलानाथ सहारे सदस्य
ॲड.नितीन तेलगोटे सदस्य
विलास त्रिवेदी सदस्य
किशोर पाटील सदस्य
सौ.मनिषा काशीकर सदस्य
प्रमोद पेंडके सदस्य
विजय फडणविस सदस्य
रामभाऊ आंबुलकर सदस्य
किसन गावंडे सदस्य
दिलीप गौर सदस्य
महेंद्र राऊत सदस्य
गिरधारी निमजे सदस्य
शैलेश ढोबळे सदस्य
FOLLOW FOR LIVE UPDATES:
khasdarmahotsavnagpur
Khasdarmohtsngp
www.khasdarmahotsav.com
प्रवेश निःशुल्क
प्रायोजक:
Reliance Industries Limited
Growth is Life
TVS
HYUNDAI
Ashok Leyland
Mahindra Rise.
TATA
Hero
BAJAJ
eka
CIAN
NEU
Radisson BLU HOTEL NAGPUR
Le MERIDIEN
CENTRE POINT HOTELS & RESORTS
PRIDE
HOTEL ASHOK
ENRISE
UCN
प्रथम येणाऱ्यास प्राधान्य


अरुणोदय प्रेस
आकर्षक छपाई करिता संपर्क साधावा
संपर्क : 7447735852
पत्ता : कॉटन मार्केट, नागपूर - 440018